# संपादकीय

## शतकाची शिदोरी ग्रंथ योजना - अ. भा. मराठी प्रकाशक संघाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम

एकविसाव्या शतकात प्रवेश करताना प्रत्येक क्षेत्रात आपण आजवर केलेल्या प्रगतीचा मागोवा घेण्याची इच्छा होणे स्वाभाविकच आहे. हे सिंहावलोकन करताना आपल्या वाटचालीतले महत्त्वाचे टप्पे समोर येतात, आणि वेळोवेळी मिळालेल्या यशाबद्दल धन्यता वाटते.

मराठी साहित्यक्षेत्रातही या नव्या सहस्त्रकाच्या स्वागताप्रीत्यर्थ काही नव्या उपक्रमांचा पाठपुरावा होणे अपरिहार्य आहे. अशा उपक्रमांमध्ये लक्षवेधक ठरेल असा एक प्रयत्न पुण्याच्या अ. भा. मराठी प्रकाशक संघातर्फे होणार आहे. 'शतकाची शिदोरी' असे या उपक्रमाचे नामाभिधान करण्यात आले आहे. गेल्या शंभर वर्षातील निरनिराळ्या वाङ्मयप्रकारातील शंभर-सव्वाशे महत्त्वाची पुस्तके निवडून ती वाचकांना भरघोस सवलतीत उपलब्ध करून द्यावीत अशी कल्पना त्यामागे आहे.

'महाराष्ट्र टाइम्स'ने १९६३ मध्ये 'स्वतः विकत घेऊन पुस्तके वाचा' ही योजना राबवून १९६२ मधील निवडक पुस्तके ४० टक्के सवलतीने वाचकांना मिळवून दिली. त्यावेळचे म. टा.च्या रविवार पुरवणीचे संपादक शंकर सारडा यांनी या योजनेसाठी सर्व प्रकाशकांचे सहकार्य मिळविले. रामदास भटकळ, रा. ज. देशमुख, विष्णुपंत भागवत, अनंतराव कुलकर्णी यांची बहुमोल मदत झाली. स्वामी (रणजित देसाई), व्यक्ती आणि वल्ली (पु. ल. देशपांडे), रायगडाला जेव्हा जाग येते (वसंत कानेटकर), चक्र (जयवंत दळवी), रथचक्र (श्री. ना. पेंडसे), मंतरलेले दिवस (गदिमा), साहित्याचे मानदंड (गंगाधर गाडगीळ), हिरवे रावे (जी. ए. कुलकर्णी), सावित्री (पु. शि. रेगे), व्यासपर्व (दुर्गा भागवत), किमया (माधव आचवल), डोह (श्रीनिवास कुलकर्णी)वगैरे पुस्तके त्या काळात घरोघर गेली याचे श्रेय या योजनेला आहे. तसेच या योजनेनंतर प्रकाशनपूर्व सवलतींची लाटच मराठी साहित्यक्षेत्रात आली आणि प्रकाशकांच्या योजकतेची तसेच लेखकांच्या लोकप्रियतेची कसोटी त्याद्वारे लागू लागली. त्यावेळी आज मराठी साहित्यक्षेत्रात सुप्रतिष्ठित झालेल्या अनेक लेखकांची उमेदवारी चालू होती. तिला लोकमान्यता देण्याचे काम प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे या योजनेने केले असे आज चाळीस वर्षानंतर म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

पुढे १९९२ मध्ये महाराष्ट्र टाइम्सने 'दशकातील पुस्तके' ही योजना राबवली. तिच्या आखणीतही शंकर सारडा यांचा सहभाग होता. त्या योजनेलाही वाचक ग्राहकांचा प्रतिसाद मिळाला. झाडाझडती (विश्वास पाटील), रारंगढांग (प्रभाकर पेंढारकर), एमटी आयवा मारू



(अनंत सामंत), चक्रव्यूह (रंगनाथ पठारे), एकेक पान गळावया (गौरी देशपांडे), चिरदाह (भारत सासणे), झोंबी (आनंद यादव), मारवा (आशा बगे), जन्मलेल्या प्रत्येकाला (प्रिया तेंडुलकर), मेड इन इंडिया (पुरुषोत्तम बोरकर), झेलझपाट (मधुकर वाकोडे), दिशा घरांच्या (सानिया), उत्तररात्र (रॉय किणीकर), एकूण कविता (दिलीप पुरुषोत्तम चित्रे), पीकपाणी (इंद्रजित भालेराव), मंत्राक्षर (अरुणा ढेरे), आहे मनोहर तरी (सुनीता देशपांडे), उचल्या (लक्ष्मण गायकवाड), एक झाड दोन पक्षी (विश्राम बेडेकर), स्वतःविषयी (अनिल अवचट), नाथ हा माझा (कांचन घाणेकर), अंगणातले आभाळ (यशवंत पाठक), माणसं-अरभाट आणि चिल्लर (जी. ए. कुलकर्णी), कृष्णाकाठ (यशवंतराव चव्हाण), टीकास्वयंवर (भालचंद्र नेमाडे), श्रीविठ्ठल-एक महासमन्वय (रा. चिं. ढेरे), टाकसाळीतील नाणी (मुकुंद टाकसाळे), मैत्र (पु. ल. देशपांडे), मितवा (ग्रेस), रानवाटा (मारुती चितमपल्ली), फुलवा (शरदिनी डहाणूकर), एक होता कार्व्हर (वीणा गवाणकर), वाडा चिरेबंदी (महेश एलकुंचवार), चारचौघी (प्रशांत दळवी), किरवंत (प्रभाकर मयेकर), देवराई (वसंत सावंत), मेखमोगरी (रणजित देसाई), प्रेषित (जयंत नारळीकर), भस्म (उत्तम बंडू तुपे) कागूद आणि सावली (आनंद पाटील), अंगारमाती (भास्कर चंदनशिव) वगैरे एकशे एक पुस्तकांचा या योजनेत समावेश झाला होता. यातील काही लेखक ज्येष्ठ असले तरी बहुसंख्य लेखक त्या दशकात नव्यानेच पुढे येत होते; आणि त्यांच्या कलाकृती बृहद् वाचकवर्गापर्यंत पोचविण्याचे काम या योजनेद्वारे निश्चितच साधले गेले.

या पुढेही अशा काही योजना झाल्या. लोकसत्तेने बालकुमार साहित्याची सवलत योजना याच धर्तीवर एकदा केली. ललितनेही दर महिन्याला ५ लक्षवेधी पुस्तके निवडून (१९९४ जानेवारीपासून) वर्षअखेरीला ६० पुस्तके सवलतीत देण्याचा उपक्रम गेली सहा वर्षे चालू ठेवला आहे. निवडलेल्या पुस्तकांचा अल्पपरिचय ललितमध्ये साडेचार वर्षे शंकर सारडा हे करून देत; आणि सवलत योजनेच्या वेळी त्यांची पुस्तिकाही काढण्यात येत असे. त्या त्या वर्षातील काही महत्त्वपूर्ण पुस्तके निवडणे वाचकांना व ग्रंथालयांना सोपे जावे या दिशेने हा प्रयत्न प्रशंसनीय आहे.

गेल्या शंभर वर्षातील शंभर-सव्वाशे उत्कृष्ट पुस्तके निवडून ती वाचक ग्राहकांना सवलतीत उपलब्ध करून देण्याचा. अ. भा. मराठी प्रकाशक संघाचा उपक्रम हा या मागील उपक्रमांच्या धर्तीवरचाच असून, एक प्रकारे त्यावर चढवण्यात आलेला कळसच आहे असे मानायला हरकत नाही. प्रकाशक संघाचे पदाधिकारी शरद गोगटे, विश्वास दास्ताने, सुनील मेहता, राजीव बर्वे, सुनील अंबिके आणि त्यांचे सहकारी या उपक्रमाबाबत उत्साहाने कामाला लागले आहेत. अशोक जैन (महाराष्ट्र टाइम्स), शंकर सारडा (लोकमत– अक्षररंग पुरवणीचे संपादक), अरुणा ढेरे, डॉ. कोत्तापले, गं. ना. जोगळेकर, म. श्री. दीक्षित, गजानन क्षीरसागर, अनंत जोशी, वगैरेंच्या सहकार्याने पुस्तकांच्या निवडीचे काम चालू झाले आहे. महाराष्ट्रातील मान्यवर व्यक्तींच्या शिफारशी मागवल्या होत्या, त्या शिफारशीतील पुस्तकांचाही विचार केला जाणार आहे. त्यामुळे ही निवड प्रातिनिधिक आणि सर्वसमावेशक राहील असे गृहीत धरायला हरकत नाही. अर्थात शंभर वर्षातील एकूण साहित्याचा विशाल पट समोर ठेवून अशी निवड करणे हे काम अवघड आहेच. अनेक चांगली पुस्तके त्यातून गळणेही

अपरिहार्य आहे. कारण पुस्तकांची संख्या मर्यादित असेल तरच ग्राहकांना ती आपल्या आटोक्यातील वाटतील. ही संख्या जर हजार-पाचशेच्या घरात गेली तर ती कोणाही वैयक्तिक ग्राहकाला आवाक्याबाहेरचीच वाटणार. तरीही विविध वाङ्मय प्रकार, कथा, कादंबरी, काव्य, नाटक, ललित गद्य. विनोदी साहित्य, प्रवासवर्णन, वैचारिक ग्रंथ, समीक्षा, आत्मचरित्र, पर्यावरण-निसर्गनिरीक्षण) विविध कालखंड व विविध वाङ्मयीन प्रवृत्ती (दलितसाहित्य, स्त्रीवादी साहित्य, ग्रामीण साहित्य, इ.) यांचा विचार करून जास्तीत जास्त सर्वसमावेशक अशी ही निवड करण्यावर कटाक्ष राहील हे नक्की!

शंभर पुस्तकांचा हा संच सुमारे दहा हजार रुपये दर्शनी किंमतीचा असेल; आणि तो सवलतीत ६००० रुपयांना देता येईल असा प्राथमिक अंदाज आहे. मात्र पुस्तकांचा निवड निश्चित झाल्यावरच नेमका आकडा काढता येईल. या शंभर पुस्तकांचा एकच संच करण्याऐवजी वेगवेगळे चार संच केल्यास वाचक ग्राहकांना सोयीचे ठरेल व परवडेल अशीही एक सूचना केली गेली आहे. एक-दोन पुस्तकेही थोड्या कमी सवलतीत मिळू शकतील. परंतु आपल्या घरी संपूर्ण संच असणे सांस्कृतिकदृष्ट्या इष्ट असेच ध्येय समोर ठेवून हा उपक्रम राबविण्यावर भर राहील. निवड करताना सर्वसामान्य सुजाण वाचक नजरेसमोर ठेवून रंजक, उद्बोधक व वाचनीय परंतु कसदार पुस्तकांचीच निवड केली जाईल. 'अभ्यासक' समोर ठेवून संदर्भ ग्रंथ, कोशवाङ्मय, वेचे, बीजग्रंथ वगैरे निवडण्याचा हेतू या योजनेचा मूलत:च असणार नाही. या योजनेच्या निमित्ताने नवनवीन पुस्तके संपादित करणे हेही अभिप्रेत नाही. उपलब्ध पुस्तकेच निवडली जातील. निवडलेल्या पुस्तकांच्या नव्या आवृत्त्या जरुर तर काढण्याची प्रकाशकांची तयारी असेल. या योजनेचा जास्तीत जास्त वाचकांना लाभ सुलभतेने घेता यावा म्हणून तिला व्यापक प्रसिद्धी मिळण्याची गरज आहे, त्याचप्रमाणे गावोगाव विक्रीव्यवस्था झाली तर ग्राहकांची सोय होऊ शकेल. ती पुस्तके पाहून जिथल्या तिथे खरेदी करता येतील. विक्रीकेंद्रे जितकी जास्त तितकी अधिक प्रतिसाद– हे सूत्र समोर हवेच.

या उपक्रमाचा आरंभ गुढीपाडव्याला व्हावा अशी कल्पना आहे. आपल्या भाषेचा, साहित्यपरंपरेचा आणि संस्कृतीचा अभिमान प्रत्येक मराठी माणसाला असतोच. असायलाच हवा. आपले घर छोटे असो वा मोठे, त्यातील एक कोपरा तरी उत्तम पुस्तकांनी सजलेला हवा. आपल्या भाषेत जे जे उत्तम असे साहित्य निर्माण होत आहे, ते आपल्याला ठाऊक हवे. त्याच्याशी आपले नाते हवे त्यातील विचारांशी आपली मानसिक जवळीक हवी. साहित्य हे मने सांधते, आपल्या समाजमानसाची ओळख पटवते, आपली अस्मिता जागवते. तेव्हा नव्या सहस्रकात आत्मविश्वासाने आणि उत्साहाने प्रवेश करताना उत्तमोत्तम पुस्तकांची 'शतकाची शिदोरी' ही आपल्या सोबतीला हवीच.

आम्ही या उपक्रमाचे स्वागत करतो. अ. भा. मराठी प्रकाशक संघाने या योजनेचे शिवधनुष्य अंगावर स्वेच्छेने घेतले आहे याबद्दल धन्यवाद देतो. मराठी वाचकग्राहकांनी या उपक्रमाला उदंड प्रतिसाद देऊन आपल्या अभिमानास्पद साहित्यपरंपरेला परिपुष्ट करावे असे आवाहन करतो.

– संपादक

सुनील मेहता



# साहित्यवार्ता

## मन आहे तोवर कविता टिकेल : सुधीर मोघे

''कविता हा अत्यंत खासगी, तरी सर्वांना बांधून घेणारा साहित्यप्रकार आहे. त्यामुळे मन आहे, तोवर कविता कायम टिकेल.'' असे प्रसिद्ध गीतकार सुधीर मोघे यांनी सांगितले.

नीहारा प्रकाशनातर्फे अपर्णा आंबेडकर यांच्या 'चांदणगाणी' या कवितासंग्रहाचे प्रकाशन 'सकाळ'चे वृत्तसंपादक सुरेशचंद्र पाध्ये यांच्या हस्ते झाले. ''वेगळेपण ओळखले, तर कविता वेगळी होते. स्वतःला शोधत गेलो की आपले वेगळेपण सापडते. सुरेल, तालशुद्ध, निर्दोष रचना करायला हवी. त्यासाठी कवितेच्या आकृतिबंधाचा अभ्यास हवा. व्याकरणाच्या अभ्यासातून अथवा श्रवणातून कवीने आपल्यामध्ये छंद मुरवून घेणे आवश्यक आहे.''

मनाच्या सादेला प्रतिसाद देते ती कविता, अशी कवितेची व्याख्या करीत पाध्ये म्हणाले, ''जाणिवेच्या पातळीवर वावरताना नेणिवेतील घडामोडीतून अंतर्मनाने घातलेल्या सादेतून कविता आकार घेते. या संग्रहातील कविता म्हणजे कवयित्रीचे आश्वासक पहिले पाऊल आहे. त्यातून त्यांची स्वतःची पाऊलवाट तयार व्हावी.'' हळव्या, पारदर्शी मनाने रचलेली अतिशय उत्कट व निसर्ग हे बलस्थान असलेली कविता, असा डॉ. शंतनू चिंधडे यांनी या कवितांचा उल्लेख केला. कविता स्फुरते कशी, हे सांगताना अपर्णा आंबेडकर म्हणाल्या, ''मनाचा वेध घेणारी घटना, निसर्गदृश्य, एखादी मनात रुतलेली ओळ यांमुळे मनात खोलवर लाटेसारख्या भावना उचंबळतात. शब्द मनात फेर धरतात आणि पाकळीपाकळीने कवितेचे कमळ उमलते.''

शीतल बेलसरे, अंजली चाफेकर, विजया रणनवरे यांनी काही कविता सादर केल्या. प्रकाशिका स्नेहसुधा कुलकर्णी यांनी स्वागत केले.

## कथेच्या विरोधातील प्रयत्नांना कथाकारांनी बळी पडू नये

''वाङ्मय व्यवहारांतून कथा वगळण्याची फर्माने काढण्याचे व कथा लिहिली जाऊ नये यासाठी दहशत निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. वाङ्मय क्षेत्रातील लोकशाही तत्त्वाला नकार देणारा हा सूर आहे. पण कथा हा सशक्त प्रकार नष्ट होणार नाही. कथेच्या विरोधातील प्रयत्नांना कथाकारांनीही बळी पडता कामा नये,'' असे प्रतिपादन ७४ व्या साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्षा डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी केले.

इंदूर येथे होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. राजाध्यक्ष

यांचा महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे राजेंद्र बनहट्टी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कथेला दुय्यम लेखणारी व तिची उपेक्षा करणारी टीका केवळ कादंबरीच लिहिणाऱ्या समीक्षकांकडून केली जात आहे, याकडे डॉ. राजाध्यक्ष यांनी लक्ष वेधले. वाङ्मय वाचत राहण्याची ऊर्मी कवितेच्या बरोबरीने कथेनेच टिकवली आहे, हे विसरता कामा नये, असे त्यांनी सांगितले. कथा या वाङ्मय प्रकारावर टीका करणाऱ्यांना उत्तर देताना त्या म्हणाल्या, ''मुळात साहित्य प्रकारात श्रेणी व्यवस्था असू नये. वाङ्मय हा चहुअंगाने डवरलेला वृक्ष आहे. या वृक्षाची 'कथा' ही एक सशक्त प्रशाखा आहे. चार-दोन लोकांच्या टीकेने या वाङ्मय प्रकाराची उपेक्षा होणार नाही. स्फुट गोष्टींपासून दीर्घकथेपर्यंतचा प्रवास आहे. लवचिक व कवितेच्या जवळ जाणारा कथा हा साहित्य प्रकार आहे.''

काही कथांचा उल्लेख 'कोंडलेल्या कादंबऱ्या' असा केला जातो. या सूत्राने काही कादंबऱ्यांचा उल्लेख 'भरकटलेल्या कथा' असाही करता येईल, पण हे योग्य नाही. कथेचे उपेक्षेने उल्लेख करून हा वाङ्मयप्रकार दुय्यम लेखला जातो, पण हा प्रकार मुळीच दुय्यम नाही. '' डॉ. मनीषा दीक्षित, डॉ. वीणा देव व डॉ. कल्याणी दिवेकर यांचीही भाषणे झाली.

## 'अग्नी' हे नाव सुब्रमण्यम भारती यांच्या काव्यातून स्फुरले– कलाम

संपूर्ण जगभरात दरारा निर्माण करणाऱ्या 'अग्नी' या क्षेपणास्त्राचे नाव थोर तामीळ कवी व देशभक्त सुब्रमण्यम भारती यांच्या कवितेतूनच आपल्याला स्फुरले, असे भारत सरकारचे प्रमुख विज्ञान सल्लागार भारतरत्न ए. पी. जे अब्दुल कलाम यांनी मुंबई येथे सांगितले.

भारती मेडिकल अँड रिसर्च फाऊंडेशनतर्फे आयोजित एका समारंभात अब्दुलकलाम बोलत होते. तामीळ कवी सुब्रमण्य भारती यांच्या पुतळ्याच्या अनावरणानिमित्त हा समारंभ आयोजित करण्यात आला होता.

ए. पी. जे. अब्दुल कलाम म्हणाले की, कवी व शास्त्रज्ञ यांच्यात एक समान धागा असतो, तो निर्मितीचा! कलाकार व शास्त्रज्ञ हे नवनिर्मितीचा ध्यास घेऊनच जगत असतात. मानवजातीला समृद्ध करण्यासाठी, प्रत्येक मानवाच्या हृदयातील दुःख मिटावे यासाठी हे दोघेही कार्य करत असतात.

सुब्रमण्यम भारती यांनी कितीतरी वर्षे आधी गंगा कावेरी या भारताच्या सांस्कृतिक विकासात महत्त्वाचे योगदान करणाऱ्या दोन नद्यांना एकत्र करण्याचे स्वप्न पाहिले होते. एका कविमनाने पाहिलेले हे स्वप्न आज भारतीय शास्त्रज्ञांच्या अथक प्रयत्नांमुळे प्रत्यक्षात उतरणार असल्याचेही अब्दुल कलाम यांनी सांगितले.

सुब्रमण्यम भारती यांचा पुतळा बनविणारे सुरेश वाघ यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. या समारंभाला अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष आर. चिदंबरम व श्रीमती चेल्लामल चिदंबरम याही उपस्थित होत्या. डॉ. राममूर्ती हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी डॉ. अब्दुल कलाम यांचा व्ही रंगनाथन यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## इंदिरा संतांच्या मालनगाथेवर नृत्यनाटिका

ख्यातनाम कवयित्री इंदिरा संत यांच्या मालनगाथेवारील आधारित अत्यंत सुरेख व शिस्तबद्ध अशी नृत्यनाटिका बेळगावच्या आर्टस सर्कलच्या वतीने सादर करण्यात आली,



अनगोळच्या प्रेरणा महिला मंडळाने ही नृत्यनाटिका सादर केली. यामध्ये २५ ते ४० वयोगटातील महिलांनी भाग घेतला. पूर्वी एकच कुटुंबात लोक कसे वावरत होते, सुना, नातवंडे, जावा, भाऊ यांचे संबंध किती घनिष्ठ होते, त्याचे प्रत्यंतर या नृत्यनाटिकेने आले. खेड्यातील घर, चूल, शेगडी, जनावरे, शेतीची अवजारे, धुणी, भांडी, तुळशीवृंदावन, जन्मलेल्या बाळाचे पालनपोषण, पाळणा, जाती, उखळ, वरवंटे याचे प्रत्यक्ष रंगमंचावर दर्शन घडले. भाजी करून सासू, सासरे, नणंद, जावा यांना जेऊ-खाऊ घालणे, भाजी चिरणे, स्नानाची तयारी, सायंकाळी देवापुढे आरती, भजन, उठल्या उठल्या सासूसासरे यांना घरातील लहान मंडळीचा आशीर्वादासाठीचा नमस्कार इत्यादी सारे काही या नृत्यनाटिकेत सादर केलेले आहे.

मालनगाथेचा कार्यक्रम व सूत्रसंचालन मेघा मराठे यांनी व यातील सर्व गाणी अर्चना बेळगुंदी यांनी सादर केली. रंगमंचावर आक्का (श्रीमती इंदिरा संत) काव्यरचना करताना पाठमोऱ्या बसल्या आहेत, मध्येच उठून त्या झोपाळ्यावर बसतात, हा देखावा हुबेहूब साकारला गेला.

## 'हिंदूइझम'वरील विश्वकोशाचे लेखन अंतिम टप्प्यात

आळंद (जि. गुलबर्गा) येथील डॉ.भीमाशंकर देशपांडे संतसाहित्य संशोधन केंद्रात गेल्या तीस वर्षांपासून संतवाङ्मयावर संशोधन सुरू असून, 'इंडिया हिंदूइझम' या विषयावर इंग्रजीतील विश्वकोशाचे लेखन अंतिम टप्प्यात आले आहे.

डॉ. देशपांडे हे या केंद्राचे संचालक आहेत. अमेरिकेतील दक्षिण कॅरोलिना विद्यापीठात कार्यरत असलेल्या भारतीय प्राध्यापकांनी 'एन्सायक्लोपीडिया ऑफ हिंदूइझम' या विषयावर विश्वकोश निर्मितीचा प्रकल्प हाती घेतला आहे. या विश्वकोशाचे मुख्य संपादक म्हणून प्रा. के. एल. शेषगिरी राव, भारतीय संपादक म्हणून प्रा. विद्यानिवास मिश्रा आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हमून डॉ. कौशल के सिन्हा हे कार्यरत आहेत. या विश्वकोश प्रकल्पातील काही भागाच्या लेखनाची जबाबदारी डॉ. देशपांडे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. डॉ. देशपांडे यांनी या विश्वकोशात विविध भारतीय सत्पुरुष, भक्त पुंडलिक, एकनाथांचे पणजोबा भानुदास कुलकर्णी, डोंगरे महाराज, रा. का. कुंभार, नित्यानंद स्वामी, जगन्मित्र नागा, महिपती, मोरया गोसावी, निळोबा राय, संत दामाजी, चन्नबसवेश्वर, श्रीधरस्वामी, सोहिरोबा, संत रोहिदास, अक्कलकोटचे स्वामी समर्थ अशा काही संतांच्या चरित्राचे संशोधनात्मक लेख लिहिले आहेत. शिवाय देवी संप्रदायाचे महत्त्व, भारतातील सर्व शंकराचार्यांच्या मठांचा इतिहास, पंचाक्षरी मंत्राचे महत्त्व, प्रजापतीचे महत्त्व आणि व्याख्या, गुरुकुल शिक्षण पद्धतीचे शास्त्रीय महत्त्व, नेपाळ हिंदू राज्य, भागवत धर्म, दैव, हिंदू धर्मातील समुद्रोल्लंघनाचे महत्त्व, वनदेवता, वरुण देवता, कात्यायन विधी, माधुरी भक्ती, वीरशैव संप्रदाय, दत्तसंप्रदाय, मूर्तिपूजाशास्त्र, चिनी पंडित युआन स्वांग, आफ्रिकन संत, अरबी, गणितज्ञ इब्न बतुत, अकबराने स्थापलेला धर्म– 'दिन-ए-इलाही' अशा शीर्षकाखाली अनेक उपलेखांचे शास्त्रीय लेखन पूर्ण झाले आहे. पुढील वर्षभरात जगातील ग्रंथालयांमध्ये या विश्वकोशाचे खंड ठेवले जाणार आहेत. अमेरिकेच्या भारतीय संस्कृतिशोध प्रतिष्ठानने हा प्रकल्प हाती घेतला आहे. हिंदू संस्कृतीची अद्ययावत व संशोधनात्मक अधिकृत माहिती या मुळे जगापुढे ठेवता येईल,

असे डॉ. देशपांडे यांनी सांगितले.

## संगणक, इंटरनेट माहितीची 'क्लिक ई डायरी' प्रकाशित

संगणक व इंटरनेटची इत्यंभूत माहिती मिळण्यासाठी 'क्लिक ई-डायरी'ची निर्मिती करण्यात आल्याचे सोलापूरचे किरण काळे यांनी सांगितले.

संगणक व इंटरनेट वापरणाऱ्या व्यक्तींना ही डायरी उपयुक्त ठरणार आहे. भारतातील सर्व क्षेत्रांतील महत्त्वाच्या वेबसाईटची नावे व त्याबद्दलची संक्षिप्त माहिती या डायरीत आहे. त्याचबरोबर सोलापूरातील संगणक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, सॉफ्टवेअर तयार करणाऱ्या संस्था, संगणकाची सेवा देणाऱ्या व विक्री करणाऱ्या संस्था यांची व इंटरने हाताळण्याबाबतची सर्व माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे.

## पुलंनी पुस्तक व वाचक यांच्यातील अंतर कमी केले : रवींद्र पिंगे

लेखकाच्या पेशाला पुलंनी प्रतिष्ठा मिळवून दिली आणि पुस्तक व वाचक यांच्यातील अंतर त्यांनी कमी केले. त्यांचे हे योगदान मोलाचे आहे, असे मत ज्येष्ठ लेखक रवींद्र पिंगे यांनी पुणे येथे व्यक्त केले.

फर्गसन महाविद्यालयात पु. ल. देशपांडे स्मृतिप्रीत्यर्थ 'आमच्या आठवणीतले पु. ल.' या विषयावरील परिसंवादात यावेळी रवींद्र पिंगे, प्रा. द. मा. मिरासदार, डॉ. वि. भा. देशपांडे, श्रीकांत मोघे यांनी आठवणी सांगितल्या.

रवींद्र पिंगे यावेळी म्हणाले, 'चैतन्य देणाऱ्या, प्रेरणा देणाऱ्या सूर्यासारखे पु. लं. चे स्थान होते. गारुड करणारे त्यांचे लेखन होते. त्यांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाचे सार त्यांना व्युत्पन्न आजोबा, कीर्तनकार वडील यांच्यामुळे लाभले. अखंड काम करण्याची त्यांची वृत्ती होती. त्यांच्यातली दानतही त्यांच्या निःस्पृह वडिलांकडून त्यांना लाभली होती. पु. लं. च्या नावाचे टपाल तिकिट काढावे, असा ठराव आगामी साहित्य संमेलनात सर्वांनी मांडावा, असे आवाहनही पिंगे यांनी यावेळी केले.

ज्येष्ठ विनोदी लेखक प्रा. द. मा. मिरासदार यांनी पु. लं. च्या सहवासातल्या काही आठवणी सांगितल्या. पु. लं. च्या व्यक्तिमत्त्वाला 'इंद्रधनुषी' रंगांची त्यांनी उपमा दिली. गडकऱ्यांच्या शाब्दिक खेळाचा पु. लं. च्या कोटिबाजपणावर प्रभाव जाणवतो. त्यात विलक्षण उत्स्फूर्तता, सहजता आहे. त्यांचे स्मरणही प्रेरणा देणारे, स्फूर्ती देणारे आहे.

डॉ. वि. भा. देशपांडे म्हणाले, पु. ल. हे उत्तम खेळिया होते. पु. ल. हा रंगमंचाचा माणूस होता तरीही विविध माध्यमांची ताकद त्यांनी त्याकाळात अचूक ओळखली आणि आकाशवाणी, दूरदर्शन, रंगमंच, चित्रपट, संगीत, साहित्य ही सारी प्रकटीकरणाची माध्यमे त्यांनी कल्पकतेने वापरली.

ज्येष्ठ अभिनेते श्रीकांत मोघे यांनी आपल्या आठवणींना अभिनयाची जोड देऊन रंग भरला. पु. लं. च्या ऐन बहराच्या काळात मला त्यांचा सहवास भरभरून लाभला हे माझे भाग्य होते. त्यांचे शब्दसामर्थ्य, त्यातला ताजेपणा, निरागसता श्वासोच्छ्वासाइतकी सहज होती. गुणी माणसे जोडत जाण्याची त्यांची वृत्ती होती. जीवनात आणि माणसात त्यांना



विलक्षण रस होता. फर्गसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देसाई यांनी स्वागत केले.

## 'फायनल व्हिक्टरी'त गोदरेज यांच्या जीवनाचा आलेख

''नवल गोदरेज यांच्यातील सत्- असत् प्रवृत्तींचा आलेख त्यांच्या जीवनावरील 'फायनल व्हिक्टरी' या पुस्तकातून बी. के. करंजिया यांनी रेखाटला आहे,'' असे ज्येष्ठ उद्योगपती डॉ. नीलकंठ कल्याणी यांनी पुणे येथे सांगितले.

ज्येष्ठ पत्रकार बी. के. करंजिया यांनी श्री. गोदरेज यांच्या जीवनावर लिहिलेल्या 'फायनल व्हिक्टरी' या पुस्तकाच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले, ज्योती सोमण यांनी पुस्तकाचा अनुवाद केला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शरच्चंद्र गोखले होते. माजी केंद्रीय मंत्री वसंत साठे हेही या वेळी उपस्थित होते.

डॉ. कल्याणी म्हणाले, ''गोदरेज यांच्या समग्र जीवनाचे अतिशय मर्मग्राही चित्रण श्री. करंजिया यांनी या पुस्तकात केले आहे. त्यांच्या जीवनातील सत् आणि असत् अशा दोन्ही प्रवृत्तींचा आविष्कार यातून होतो, आणि शेवटी सत्प्रवृत्तीचाच विजय होतो, हेही त्यातून स्पष्ट होते. देशाच्या औद्योगिक जडणघडणीत ज्या औद्योगिक घराण्यांचा मोठा सहभाग आहे, त्यात गोदरेज यांच्या घराण्याचे स्थान फार वरचे आहे. साबणापासून संगणकापर्यंत आणि फर्निचरपासून मशीन टूल्सपर्यंत उत्पादनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत त्यांनी यशस्वी वाटचाल केली. या वाटचालीत सामाजिक बांधिलकी ते कधी विसरले नाहीत. गुणवत्तेचा आग्रह आणि कामगारांवर प्रेम करणारा हा उद्योजक होता. आपल्या कामावर जशी त्यांची निष्ठा होती, तसे संगीतासारख्या कलेवरही ते मनोमन प्रेम करीत असत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील या साऱ्या वैशिष्ट्यांचे दर्शन घ्यावयाचे, तर हे पुस्तकच वाचावयास हवे. ''

श्री. करंजिया आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, '' नवल गोदरेज यांच्याविषयी बोलताना ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ नानी पालखीवाला म्हणाले होते, 'या माणसाने देशासाठी अमर्याद संपत्ती निर्माण केली, स्वतःसाठी मात्र त्यातील अतिशय कमी खर्च केली.' पालखीवाला यांनी केलेले गोदरेज यांचे हे वर्णन खरे आहे. प्रसिद्धिपराङ्मुख असल्याने त्यांचे अनेक गुण लोकांच्या पुढे कधी आलेच नाहीत.''

पुस्तकाचे प्रकाशक उल्हास लाटकर यांनी प्रास्ताविक केले. पुस्तकाच्या अनुवादिका ज्योती सोमण, शरच्चंद्र गोखले, वसंत साठे यांचीही या वेळी भाषणे झाली.

## चार मराठी लेखकांचे साहित्य वॉशिंग्टन ग्रंथालय जतन करणार

कवी मंगेश पाडगावकर, 'उचल्या'कार लक्ष्मण गायकवाड, कवी नामदेव ढसाळ आणि लेखक गंगाधर गाडगीळ यांच्या साहित्यकृती वॉशिंग्टन ग्रंथालयात जतन करण्यात येणार आहेत.

वॉशिंग्टन ग्रंथालयाच्या वतीने प्रसिद्ध साहित्यिकांच्या साहित्यकृती व मुलाखती विशिष्ट तंत्राने जतन करून ठेवल्या जातात. या वर्षी जगभरातील १३ साहित्यिकांच्या साहित्यकृतींची निवड या ग्रंथालयाने केली आहे. त्यामध्ये मराठी भाषेतील मंगेश पाडगावकर, नामदेव

ढसाळ, गंगाधर गाडगीळ व लक्ष्मण गायकवाड यांच्या साहित्याचा समावेश आहे.

श्री. गायकवाड सध्या उमाजी नाईक यांचे चरित्र लिहित आहेत. त्यांचे 'समाज, साहित्य व स्वातंत्र्य' या विषयावरील समीक्षात्मक पुस्तक लवकरच प्रकाशित होणार आहे. 'दुभंग' हे किल्लारीच्या भूकंपावर आधारित असलेले पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. याशिवाय 'चिनी मातीतील दिवस' हे प्रवासवर्णन व 'वडार वेदना' हे वडार समाजाची स्थिती स्पष्ट करणारे पुस्तक प्रकाशित झालेले आहे. 'उचल्या'कार अशी ख्याती मिळवून देणाऱ्या त्यांच्या 'उचल्या' ची बंगाली, मल्याळम्, उर्दू, कन्नड, तेलगू, गुजराती, इंग्रजी व फ्रेंच भाषांतरे झाली आहेत. उचल्याने त्यांना वयाच्या बत्तीसाव्या वर्षी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळवून दिला (१९८८). हा पुरस्कार मिळविणारे ते मराठवाड्यातील पहिले लेखक आहेत.

महाराष्ट्र शासनाने सुरू केलेला पहिला महाराष्ट्र गौरव पुरस्कार त्यांना माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हस्ते सोलापूर येथे (१९८९) देण्यात आला. याशिवाय बंडोमुकादम पुरस्कार, पाणदंडी पुरस्कार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार, गालीबरत्न पुरस्कार, नांदेडचा लोककल्याण पुरस्कार आदी पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. प्रसिद्ध लेखिका महाश्वेती देवी यांच्यासमवेत ते सध्या भटक्या विमुक्त जमाती संघटनेत काम करीत आहेत. मानवी हक्क आयोगाचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

## साहित्याचे अमृत 'कुपी'त साठविण्याचा अनोखा विदेशी प्रयोग

खरा कवी हा कोणत्याही विचारांचा प्रचारक नसतो. कोणताही कलावंत हा पक्ष, पंथ, इझम याच्यापलीकडे उभा असला पाहिजे. सर्वात महत्वाचे म्हणजे त्याची बांधिलकी ही जीवनाच्या प्रामाणिक अनुभूतीशी असायला हवी, असे विचार मराठीतील प्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकर यांनी व्यक्त केले.

'यू. एस. लायब्ररी ऑफ काँग्रेस' (अमेरिकेच्या संसदेची लायब्ररी) ला दोनशे वर्षे पूर्ण झाल्याबद्दल जगभरातील निवडक लेखकांचे साहित्य ध्वनिमुद्रित करण्याचा मोठा प्रकल्प अमेरिकन सेंटरतर्फे हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत कवी मंगेश पाडगावकर यांच्या निवडक कविता ध्वनिमुद्रित करण्यात आल्या. यावेळी त्यांनी आपले काव्यविषयक विचार व्यक्त केले.

ते म्हणाले की, मी कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा 'इझम'च्या झेंड्याखाली कधीही उभा नव्हतो. आताही नाही. या माझ्या वृत्तीचा मला निश्चितच अभिमान आहे. प्रारंभी मंगेश पाडगावकर यांनी अमेरिकन सेंटरविषयीची कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले की, अमेरिकन सेंटरच्या या इमारतीत मी १९७० ते ९० अशी २० वर्षे नोकरी केली आहे. त्यामुळे माझ्या मनात कृतज्ञतेची भावना आहे.

मंगेश पाडगावकर यांनी धारानृत्य, जिप्सी, छोरी, उत्सव, सलाम, विदूषक, गझल इ. निवडक कविता आपल्या खास ढंगात पेश केल्या. 'धारानृत्य' ते 'मीरा'पर्यंतच्या काव्यप्रवासाचा आढावा घेतला. मंगेश पाडगावकरांव्यतिरिक्त मुंबईतील अन्य दहा कवी व लेखकांच्या साहित्यकृती त्यांच्याच आवाजात अमेरिकन सेंटरमध्ये २० डिसेंबर ते २२ डिसेंबर दरम्यान



ध्वनिमुद्रित करण्यात आल्या. या लेखकांच्या ध्वनिफिती अमेरिकन सेंटरच्या लायब्ररीत जागतिक सांस्कृतिक ठेव्याचा भाग म्हणून जतन करण्यात येतील. यामुळे अमेरिका व भारतातले साहित्यिक व सांस्कृतिक संबंध सुधारण्यास मदत होईल असे मत लायब्ररी ऑफ काँग्रेसच्या दक्षिण आशियातील ज्येष्ठ अधिकारी अशोक बुटारी यांनी केले.

दलित साहित्यात आपल्या रांगड्या लिखाणाने क्रांती घडवून आणणारे लोकप्रिय साहित्यिक प्रा. लक्ष्मण गायकवाड यांनी त्यांच्या 'उचल्या', 'दुभंग', 'वडार वेदना' व 'चिनी मातीतील दिवस' या कादंबऱ्यांमधील काही प्रकरणांचे वाचन केले. कन्नडमध्ये आपल्या विलक्षण कथालेखनाने नाव मिळवलेले यशवंत चित्तल, नामदेव ढसाळ, खुशवंतसिंग, मुल्कराज आनंद, गंगाधर गाडगीळ यांच्यासारख्या अनेक ज्येष्ठ साहित्यिकांचे साहित्य त्यांच्याच आवाजात अमेरिकन सेंटरच्या लायब्ररीत जतन केले जाणार आहे.

## व्यापक व जागतिक चळवळींसाठी माणसाचा समग्र विचार गरजेचा

''एकविसाव्या शतकात प्रागतिक चळवळी अधिक व्यापक व जनाधारावर उभ्या करावयाच्या असल्यास माणसाचा समग्र विचार करावा लागेल,'' असे मत ज्येष्ठ विचारवंत प्रा. रावसाहेब कसबे यांनी पुणे येथे व्यक्त केले.

समता प्रतिष्ठानतर्फे राज्याचे उद्योगमंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या हस्ते त्यांना 'सत्यशोधक दिनकरराव जवळकर पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

डॉ. कदम म्हणाले,''दिनकरराव जवळकर यांच्याकडे महात्मा फुले यांचा वैचारिक वारसा होता, ''बहुजन समाजात जन्माला आलेले महात्मा फुले कार्ल मार्क्सच्या तोडीचे द्रष्टे विचारवंत होते. मार्क्सने माणसाचा समग्र विचार केला. महात्मा फुले यांनीही त्याच प्रकारे वैचारिक मांडणी केली. त्यांनी पुरुषापेक्षा स्त्रीला अधिक श्रेष्ठत्व दिले. प्रेम, त्याग व सहनशीलता हे गुण स्त्रियांमध्ये अधिक प्रमाणात असतात, म्हणून ती पुरुषांपेक्षा श्रेष्ठ असते, असे त्यांचे मत होते.परिवर्तनाची चळवळ पुन्हा जोमाने सुरू होण्याची गरज आहे.महाराष्ट्र हे एक पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. ते काही एका दिवसात पुरोगामी बनलेले नाही; तर त्याला अनेक सामाजिक चळवळींची पार्श्वभूमी आहे''

डॉ. राम ताकवले, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष भाई वैद्य, कार्याध्यक्ष मधुकर निरफराके, चिटणीस शिवाजीराव खैरे आदींनीही मनोगत व्यक्त केले.

## विद्यार्थ्यांवर संस्कार करण्यासाठी साने गुरुजी संस्कार साधना प्रकल्प

बदलत्या जीवनशैलीमुळे निर्माण झालेल्या नव्या संस्कृतीतही विद्यार्थ्यांवर चारित्र्य, सद्वर्तन, वाचन यांबाबतचे संस्कार करण्यासाठी 'साने गुरुजी संस्कार साधना' हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

अध्यापनाचा दीर्घकाळ अनुभव असलेले प्राचार्य प्र. द. पुराणिक यांनी या प्रकल्पाचा आराखडा तयार केला आहे. या प्रकल्पाबद्दलचे प्रयोग त्यांनी काही ठिकाणी केले आहेत. ''मूल्याधिष्ठित समाज परिवर्तनाचा हा साधा मार्ग आहे : ते म्हणाले, ''महात्मा गांधी, विनोबा

भावे, साने गुरुजी यांच्या आचारविचारांचा प्रभाव या प्रकल्पावर आहे. दिनचर्येपासून प्रत्येक टप्प्यावर स्वयंमूल्यमापनाची सवय बालवयातच लावण्याचा प्रयत्न या प्रकल्पाद्वारे होणार आहे. बालक आणि पालक यांच्यातील महत्त्वाचा दुवा असणाऱ्या शिक्षकांना या प्रकल्पात सहभागी करून घेण्यात येणार आहे.

शिक्षक, पालक, विद्यार्थी यांची स्वतंत्र आणि संयुक्त शिबिरे प्रकल्पांतर्गत घेण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. सेवाभावी शिक्षकांना 'संस्कार साधना पुरस्कार' देण्याची योजनाही त्यांनी सांगितली.

'साने गुरुजी संस्कार साधना'च्या कार्यपद्धतीची माहिती देणारी पुस्तिका तयार करण्यात आली आहे. ती संस्थांना पाठविण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी प्रा. पुराणिक यांच्याशी ५४३२६४२ आणि ५४३३७५७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## जयकर ग्रंथालयाने मला वाचक बनविले : डॉ. अवचट

पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाने खऱ्या अर्थाने मला वाचक बनविले व त्यातूनच माझ्या जीवनाला कलाटणी मिळाली, असे डॉ. अनिल अवचट यांनी जयकर ग्रंथालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित वाचक मेळाव्यात सांगितले.

विद्यापीठाच्या रम्य नैसर्गिक वातावरणात ग्रंथालयातील पुस्तके वाचण्याचा हुरुप येत असे व या उत्साहापोटी शेकडो पुस्तके मी वाचली. या वेडातून माझ्या जीवनाला कलाटणी मिळाली.

मनुष्याचे जीवन खऱ्या अर्थाने पुस्तकाच्या रूपाने समृद्ध होते, हे मी अनुभवले आहे. डॉ. ग. प्र. प्रधान यांच्या प्रेरणेने अनेक पुस्तके वाचली आहेत, असे भाई वैद्य यांनी सांगितले. डॉ. प्र. ल. गावडे म्हणाले की, राजेसाहेब होळकर, सातारचे बुवा गोसावी या सारख्या मोठ्यांचे साहित्य संग्रह केवळ इथेच पहावयास मिळतात.

पुस्तकी ज्ञानावर विज्ञान व आपली संस्कृती उभी आहे आणि ग्रंथ हेच खरे गुरू आहेत, असे मनोगत विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. श्रीधर गुप्ते यांनी व्यक्त केले.

प्रा. ग. प्र. प्रधान यांनी ग्रंथालयाशी जोडलेल्या काही आठवणी आपल्या भाषणात सांगितल्या. ते म्हणाले, राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांच्या हस्ते ग्रंथालयाचे उद्घाटन झाले, त्या वेळी मी हजर होतो. ग्रंथ हेच गुरू आहेत हे मी अनुभवले आहे.

## रा. चिं. ढेरे यांना महाराष्ट्र फाउंडेशनचा गौरव पुरस्कार

महाराष्ट्र फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणारे यंदाचे मराठी साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आले असून, यंदाचा गौरव पुरस्कार संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. रा. चिं. ढेरे यांना, तर विशेष पुरस्कार रा. वि. सोवनी यांना जाहीर करण्यात आला आहे.

मराठी साहित्यासाठी देण्यात येणारा दोन लाख रुपयांचा गौरव पुरस्कार ढेरे यांना जाहीर करण्यात आला. त्याचप्रमाणे ५० हजार रुपयांचा विशेष पुरस्कार विज्ञान लेखक रा. वि. सोवनी यांना जाहीर करण्यात आला आहे.



वैचारिक नियतकालिकासाठी देण्यात येणारा पुरस्कार सृष्टिज्ञान (संपादक– नारायण नीळकंठ मेडदकर) या नियतकालिकाला जाहीर करण्यात आला. पन्नास हजार रुपये व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. त्याचप्रमाणे उत्कृष्ट ग्रंथांसाठी असलेल्या ग्रंथ पुरस्कारांसाठी तणकट (लेखक– राजन गवस), आतंक (विलास सारंग), कर्मयोगी संन्यासी (नरेंद्र चपळगावकर), शोकात्म विश्वरूप दर्शन (स. रा. गाडगीळ), नवरात्र (अशोक चोसाळकर) या ग्रंथांची निवड झाली. पंचवीस हजार रुपये व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

२८ डिसेंबरला माटुंगा येथील कर्नाटक संघात पारितोषिक वितरण सोहळा झाला. प्रा. नलिनी पंडित या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होत्या. कन्नड लेखक चंद्रशेखर कंबार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

केशव गोरे स्मारक ट्रस्टने नियोजित केलेल्या येथील समितीचे काम मृणाल गोरे, प्रा. दिगंबर पाध्ये, नारायण सुर्वे, डॉ. विजया राजाध्यक्ष, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, प्रा. वसंत आबाजी डहाके, सतीश काळसेकर, डॉ. सुधीर पानसे यांनी पाहिले; तर अमेरिकेतील अंतिम निवड समितीचे काम दिलीप चित्रे, सुनील देशमुख, राजन गडकरी, अशोक सबनीस, विद्युल्लेखा अकलूजकर, डॉ. ललिता गंडभीर, संध्या कर्णिक, पद्मजा फाटक यांनी पाहिले.

प्राचीन काळातील विविध संप्रदाय, समाजातील दैवते, रूढी, मिथ्यकथा यासंबंधीचे संशोधन करून त्या क्षेत्रात श्री. ढेरे यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे.

प्रा. रा. वि. सोवनी गेल्या ४० वर्षांपासून मराठीतून विज्ञानविषयक लेखन करीत आहेत. कन्सल्टिंग रूम, चंद्रावर स्वारी, पृथ्वीची गोष्ट, मत्स्यजीवन, मानवी अनुवांशिकता, हॅलेचा धूमकेतू आदी पुस्तके त्यांनी लिहिली. १९७२ मध्ये प्रा. सोवनी यांचा मराठी विज्ञान परिषदेकडून विज्ञानप्रसारासाठीच्या कार्याबद्दल गौरव करण्यात आला. त्यांना फाय फाउंडेशनचा पुरस्कारही मिळाला आहे.

श्री. ढेरे यांनी पुणे विद्यापीठातून पदवी शिक्षण पूर्ण केले. याच विद्यापीठातून त्यांनी पीएच. डी.ही केली. श्री विठ्ठल एक महासमन्वय, लज्जागौरी इ. अनेक पुस्तके गाजली. चक्रपाणी, दत्तसंप्रदायाचा इतिहास, श्री नामदेव एक विजययात्रा, मुसलमान मराठी संतकवी, प्रवासी पंडित (लघुचरित्र) या पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार मिळाले आहेत.

## रमाबाई आंबेडकर पुरस्कार

नाशिक येथील युगांतर प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा मातोश्री रमाबाई आंबेडकर पुरस्कार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सुगंधाताई शेंडे (१९९९) व आंध्र प्रदेशातील फातिमाबी सय्यद (२०००) यांना जाहीर झाला. स्वातंत्र्यसैनिक नागनाथ नायकवडी आणि ॲड. एकनाथ आवाड यांना कर्मवीर दादासाहेब गायकवाड, तर नाशिकचे विवेक गरुड यांना बंधुमाधव पुरस्कार देण्याचे जाहीर झाले.

प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष रंगनाथ डोळस यांनी नाशिक येथे पुरस्कारांची घोषणा केली. २७ जानेवारीला सायंकाळी सहा वाजता परशुराम साईखेडकर नाट्यगृहात पारितोषिक वितरण होणार आहे.

सामाजिक व साहित्य क्षेत्रात, तसेच तळागाळातील घटकांच्या समाजपरिवर्तनाकरिता अखंडपणे काम करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार दिला जातो. अकरा हजार रुपये, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. नाट्यसंहितेसाठीच्या बंधुमाधव पुरस्काराचे पाच हजार रुपये, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह असे स्वरूप आहे.

गेल्या वर्षी पुरस्कारांची घोषणा झाली नव्हती. त्यामुळे यंदा दोन वर्षांच्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. १९९९ च्या रमाबाई आंबेडकर पुरस्काराच्या मानकरी श्रीमती शेंडे या पुणे विभागाच्या निवृत्त शाळा निरीक्षक आहेत. श्रीमती शेंडे यांनी 'मातीचा सुगंध' 'सेवाग्राम', 'आपले बाबा', 'गौतमाची गोष्ट' आदी पुस्तके लिहिली आहेत. तसेच 'विरतं धुकं', 'अग्निशिखा' हे काव्यसंग्रह, 'बाबासाहेबांची धम्मदीक्षा' (ऐतिहासिक), 'जाहली कडू कारली गोड', 'सावली सुखाची' ही नाटके लिहिली आहेत.

रमाबाई आंबेडकर पुरस्काराच्या यंदाच्या मानकरी फतिमाबी सय्यद अशिक्षित आहेत; परंतु त्यांनी कालवा (जि. कर्नुल, आंध्र प्रदेश) येथील सरपंचपद सांभाळल्यावर धडाडीने विकासकामे केली. त्यांच्या या कामाची दखल संयुक्त राष्ट्रसंघाने घेतली. न्यूयॉर्क येथे बोलावून संघाचे सरचिटणीस कोफी अन्नान यांच्या हस्ते त्यांना दारिद्र्य निर्मूलनासाठीचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते.

दादासाहेब गायकवाड पुरस्काराचे मानकरी ॲड आवाड यांनी विविध सामाजिक चळवळींत भाग घेतला आहे. मानवी हक्क अभियानाचे ते अध्यक्ष आहेत. १९९९ च्या बंधुमाधव पुरस्काराचे मानकरी विवेक गरुड चार्टर्ड अकाउंटंट असून, रंगभूमीवर त्यांचा सक्रिय सहभाग असतो. त्यांच्या 'युद्धकथा' या नाटकाची उत्कृष्ट नाटक म्हणून निवड झाली आहे.

## कोथरुड उपनगरीय साहित्यसंमेलन

साहित्य कलायात्रीतर्फे आयोजित केलेल्या कोथरुड उपनगरीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन शिवाजी सावंत यांच्या मुलाखतीने झाले. (पुणे दि. २३-१२-२००) सुधीर गाडगीळ व नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांच्याशी झालेल्या या गप्पांच्या मैफलीने कार्यक्रमात रंगत आणली. ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, ज्येष्ठ दिग्दर्शक राम गबाले व अन्य मान्यवर या वेळी उपस्थित होते.

'मृत्युंजय'चे लेखन ही कोणत्याही व्यक्तीने दिलेली प्रेरणा नव्हती, तर दीर्घकालीन मानसिक प्रक्रियेचे ते प्रतिबिंब होते, असे सांगून श्री. सावंत म्हणाले, ''आजरा (जि. कोल्हापूर) येथे माझे लहानपण गेले. तेथील निसर्गसौंदर्याने शब्द, नाद, गंध व सौंदर्याचा आविष्कार झाला. उत्सवामधील भजन-कीर्तनांनी कलेची आवड निर्माण केली त्यातून पुढे लेखनाची उर्मी निर्माण झाली व माझ्या साहित्यकृती घडल्या. मनन चिंतनाच्या अंती माझ्या लक्षात आले, की प्रत्येक व्यक्तीच्या मनात एक कर्ण वसलेला असतो. त्यामुळे त्या कृष्णाचा अंश असतो. त्यामुळे त्या व्यक्तिरेखा मी चितारल्या. त्या केवळ ऐतिहासिक व पौराणिक व्यक्तिरेखा नाहीत.''



मनाची मशागत करणारी शब्दसृष्टी म्हणजे साहित्य, अशी साहित्याची व्याख्या त्यांनी केली. ते म्हणाले, ''अनेकदा लेखक आपल्या साहित्यकृतींमध्ये अडकतात. भागवतपंथीय संतांचा प्रभाव माझ्यावर असल्यानेच मी अलिप्त राहू शकलो. 'मृत्युंजय'मध्येच अडकलो असतो तर युगंधर'चे लेखन माझ्याकडून झालेच नसते. सर्वस्व पणाला लावून कर्म करा पण फळाची अपेक्षा धरू नका असे सांगणारा श्रीकृष्ण हा जगातील सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञ होता. आदिवासी मुलीशी विवाह करून तिला राणी बनविणारा तो पहिला सवर्ण पुरोगामी पुरुष होता. माझ्या चिंतनातून त्याला मी तत्त्वज्ञ योद्ध्याच्या रूपात मांडले. प्रत्येकाला आपापल्या मनातील कृष्णाचे दर्शन कादंबरीतून झाले तर ते मला कुठल्याही पुरस्कारापेक्षा अधिक मोलाचे वाटते.'' या वेळी 'मृत्युंजय' कादंबरीबाबत वाचकांनी विविध प्रकारे दिलेल्या प्रतिसादाचे किस्से त्यांनी सांगितले. त्यातच कादंबरीच्या प्रती थेट विमानाने कराचीला पाठविण्यात आल्याचा प्रसंग, लतादिदींनी दिलेली दाद या आठवणी त्यांनी सांगितल्या.

'लेखकाला एकच प्रसंग अनेक अंगांनी स्पर्शायला हवा. ती लेखकाची खरी कसोटी ठरते. त्याच्या मनात जितके प्रश्न निर्माण होतात, तितके त्याचे लेखन सकस होते. आपल्या भावना व्यक्त करण्याचा कादंबरी हाच सर्वांत प्रभावी मार्ग आहे. नाटकाचा आकृतिबंध मर्यादित असतो. त्यामुळे ते लिहिण्यासाठी बरेच परिश्रम घ्यावे लागतात. कादंबरीकार हा उत्तम कवी, नाटककारही असणे गरजेचे असते,'' असेही त्यांनी सांगितले.

संस्थेतर्फे यशोदाबाई शिरुडे पुरस्कार मंगला गोडबोले यांना व रविराज प्रकाशन या संस्थेला देण्यात आला.

राम कदम पुरस्कार कवयित्री हेमा लेले यांना प्रदान करण्यात आला. याशिवाय मधू पोतदार, डॉ. दामोदर खडसे, मुकुंद टांकसाळे, मिलिंद वेर्लेकर, सतीश पोरे, सुभाषचंद्र जाधव आणि संजीवनी बोकील यांचाही या वेळी खास सत्कार करण्यात आला. संमेलनाच्या निमित्ताने भरविलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन सावंत यांच्या हस्ते झाले. अरविंद ढवळे यांनी प्रास्ताविक व संजीवनी बोकील यांनी सूत्रसंचालन केले. सतीश परळीकर यांनी आभार मानले.

## मृत्युंजयकार शिवाजी सावंत यांच्या षष्ट्यब्दीनिमित्त गौरवग्रंथ प्रकाशित

'शिवाजी सावंत यांना प्रतिभेची अमूल्य देणगी लाभली असून त्यांनी साहित्य रसिकांना यापुढेही आपल्या या शक्तीचा आनंद द्यावा' अशी अपेक्षा प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी 'मृत्युंजयकार शिवाजी सावंत : व्यक्ती आणि साहित्य' या गौरवग्रंथाचे प्रकाशन करताना व्यक्त केली. ३० डिसेंबर २००० रोजी श्री. सावंत यांच्या षष्ट्यब्दीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सकाळचे संपादक श्री. अनंत दिक्षित होते. याप्रसंगी भा. द. खेर, ना. स. इनामदार, रा. ग. जाधव, वीणा देव इ. मान्यवरांची भाषणे झाली.

पत्रकार म्हणून काही वर्षे काम केलेले श्री. शांताराम वाघ यांनी सा ग्रंथ संपादित केला असून त्यात डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, आचार्य अत्रे, प्रा. शिवाजीराव भोसले, प्रा. रा. ग. जाधव, डॉ. यू. म. पठाण, अनिरुद्ध कुलकर्णी, शंकर सारडा, डॉ. विभा देशपांडे इ.

मान्यवरांचे लेख आहेत. सावंतांनी विविध साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेली भाषणे व कासी हिंदी भाषिक साहित्यिकांचे लेखही या ग्रंथात समाविष्ट केले आहेत. इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक स. मा. गर्गे यांची प्रस्तावना या ग्रंथाला लाभली अहे.

अध्यक्ष अनंत दिक्षित यांनी सावंत हे रसिकमान्य साहित्यिक असल्याचे सांगितले. आपल्या उत्तरादाखल केलेल्या भाषणात शिवाजी सावंत यांनी आपल्या कलाकृतींवर उदंड प्रेम करणाऱ्या वाचकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

## 'नवा विचार मांडूनही रंगभूमीचा प्रेक्षक वाढला नाही'

प्रायोगिक रंगभूमीने आशय, सादरीकरणदृष्ट्या अनेक नवे विचार मांडणारी नाटके वर्षानुवर्षे सादर केली; पण या रंगभूमीचा प्रेक्षक वाढला नाही, ही वस्तुस्थिती आहे. असे मत अभिनेत्री नीना कुलकर्णी व दिग्दर्शक-अभिनेते दिलीप कुलकर्णी या जोडप्याने पुणे येथे व्यक्त केले.

साहित्य कलायात्री आयोजित सातव्या कोथरूड उपनगर साहित्य संमेलनात त्यांची प्रकट मुलाखत डॉ. वि. भा. देशपांडे व मंगेश कुलकर्णी यांनी घेतली.

नीना व दिलीप कुलकर्णी या दोघांनीही सत्यदेव दुबे यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले आहे. माझी नाटकाची आवड दुबे यांच्यामुळेच जोपासली गेली. त्यांच्या ग्रुपमध्ये मी ८/१० हिंदी नाटके केली. नाटकाच्या अनेक मूलभूत गोष्टी मी दुबे यांच्याकडेच शिकले, असे नीना कुलकर्णी म्हणाल्या.

सत्यदेव दुबे यांच्यामुळेच मी दिग्दर्शक झालो. ते हाडाचे शिक्षक आहेत. आपल्यातील सर्वस्व ते नटाला देतात; मात्र नटानेही ते घ्यावे लागते, असे दिलीप कुलकर्णी यांनी सांगितले.आम्ही नाट्यक्षेत्रात काही वर्षे काम करून मग यातील करीयरचा विचार केला. आताच्या पिढीने या संदर्भातील निर्णय विचारपूर्वक करणे आवश्यक आहे, असेही दोघे म्हणाले.

## वैदर्भीय लेखिका संमेलन

स्त्रीला समाजात नेहमीच दुय्यम स्थान मिळत आले असून गेल्या शतकात परिस्थिती फारशी बदललेली नसली तरी बदलाची सुरुवात मात्र आशादायी आहे. ज्ञानाची कुठलीही शाखा स्त्रीला वर्ज्य नाही. एकविसाव्या शतकात प्रवेश करताना स्त्रियांनी आपली दृष्टी विशाल करण्याची गरज आहे, असे विचार मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा श्रीमती वसुंधरा पेंडसे-नाईक यांनी नागपूर येथे मांडले.

नावीन्य कला अकादमीच्या सहकार्याने आयोजित विदर्भ साहित्य संघाच्या पाचव्या वैदर्भीय लेखिका संमेलनाचे उद्घाटन श्रीमती वसुंधरा पेंडसे-नाईक यांच्या हस्ते झाले. महापौर वसुंधरा मसूरकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा राज्यमंत्री सुलेखा कुंभारे या संमेलनाच्या स्वागताध्यक्ष होत्या.

वसुंधरा पेंडसे-नाईक म्हणाल्या की, आपण एकविसाव्या शतकात कुठली शिदोरी घेऊन जाणार याचा विचार करण्याची गरज आहे. तसेच वाद, अभिनिवेशापासून दूर राहून मावळत्या शतकाने आपल्याला काय दिले याचाही विचार करावा लागेल. जिजामाता,



झाशीची राणी, अहिल्याबाई यांचा आदर्श स्त्रियांसमोर आहे. महिलांना ज्ञानचक्षू देणाऱ्या सावित्राबाई फुले यांचे महाराष्ट्रावर न विसरता येणारे उपकार आहेत. येथूनच खऱ्या अर्थाने संघर्षाला प्रारंभ झाला. बंडखोर वृत्ती आणि अडीअडचणींना तोंड देत आज आपण ज्या टप्प्यात आहेत तो आशादायक आहे. प्रकाशाची बेटे आपण बघितली पाहिजेत. स्वतंत्र विचार करण्याची शक्ती स्त्रीला प्राप्त झाली असून येणारे सहस्त्रक स्त्रियांचेच राहणार आहे.

स्त्रियांनी विज्ञानाचा फायदा करून घ्यावा. जेनेटिक्समुळे अनेक जुन्या कल्पनांना हादरे बसले आहेत. विज्ञानाच्या गरुडझेपेमुळे स्त्रियांच्या मार्गातील अनेक अडसर दूर होत आहेत. स्त्रीमधील निसर्गदत्त गुण तिचे बलस्थान आहे. मनाचे पापुद्रे उलगडण्याचे कार्य स्त्री अत्यंत हळुवारपणे करू शकते.

त्याचप्रमाणे नवनिर्मितीची क्षमता पुरुषापेक्षा कितीतरी जास्त पटीने तिच्यात आहे. याचा उपयोग तिने साहित्यनिर्मितीत करावा.

स्त्री आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर झाल्याने तिच्यात खंबीर वृत्ती येत आहे. एवढे वर्ष संपूर्णपणे आपल्यावर अवलंबून असणारी स्त्री आपल्यावर अवलंबून नसून आपल्याला आव्हान देत आह, हे बघितल्यानंतर पुरुषाचा अहंकार दुखावला जातो. ही प्रक्रिया स्वाभाविक असून स्त्रियांनी अक्कलहुशारीने हे आव्हान स्वीकारावे. अशक्य होईपर्यंत सहकार्य आणि शक्य होणार नाही तेथे संघर्ष अशी भूमिका ठेवावी. संघर्ष करताना एकमेकींसाठी संघटित होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

स्त्रीस्वातंत्र्याचा विचार करताना ते किती मर्यादेपर्यंत असावे याचाही विचार व्हावा. अमर्याद स्वातंत्र्य हितकारक नाही. दुसऱ्यांनी आपल्यावर बंधने लादू नये तर याची काळजी घेतानाच आपण आपल्यावर बंधन ठेवले पाहिजे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आविष्कार करताना याकडे लक्ष द्यावे असे आवाहन त्यांनी केले.

स्वागताध्यक्ष ना. सुलेखा कुंभारे यांनी लेखिकांनी दलित, आदिवासी समाजातील महिलांचे दुःख, समस्या लेखनाच्या माध्यमातून समाजापुढे मांडाव्यात, असे आवाहन केले. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष सुरेश द्वादशीवार यांनी स्त्रीला स्त्री म्हणून नाही तर देवी मानले गेले, यामुळेच ती मागे राहिली अशी खंत व्यक्त केली. विदर्भ साहित्य संघातर्फे श्रीपाद जोशी यांनी तर नावीन्य कला अकादमीतर्फे माधुरी अशिरगडे यांनी प्रास्तविक केले.

## जागतिकीकरणाच्या आघाताविषयीची जागृती दलित साहित्याद्वारे व्हावी

खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणामुळे देशातील अंगमेहनतीला, श्रमाला स्थान उरले नसून त्यांच्या वाटा बंद होत आहेत, जागतिकीकरणाच्या नावाखाली चाललेल्या नव्या अर्थकारणाचा आघात समाजातील छोट्याछोट्या, शोषित-पीडित वर्गावर होत आहे. त्याबाबतची जाणीव आणि जागृती दलित साहित्याद्वारे व्हावी, असे प्रतिपादन नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर यांनी केले.

बार्शी येथे फुले-शाहू-आंबेडकर विचार प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित दोन दिवसांच्या राज्यस्तरीय दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटन पाटकर यांच्या हस्ते १२ डिसेंबर रोजी झाले. डॉ. जनार्दन वाघमारे हे अध्यक्षस्थानी होते. या वेळी खासदार रामदार आठवले हेही

उपस्थित होते. स्वागताध्यक्ष आमदार दिलीप सोपल यांनी स्वागत केले, तर प्रतिष्ठानचे श्रीधर कांबळे यांनी प्रास्तविक केले.

फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांची संपूर्ण परंपरा देशातील खऱ्या अर्थाने बहुजन समाजाचे संघटन पुढे नेणारी आहे. दीन-दलितांच्या स्वप्नाला साकार करणारे साहित्य त्यातूनच निर्माण झाले आहे. या वैचारिक अधिष्ठानाला महात्मा गांधी आणि मार्क्सवादाचीही जोड मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त करून मेधा पाटकर म्हणाल्या की, आजच्या जागतिकीकरणाची लाट थोपवून बेरोजगार आणि विस्थापितांनाच नव्हे तर दलित स्त्रीलासुद्धा जमिनीवरच्या पाण्यावरच्या हक्कापासून प्रत्येक प्रक्रियेतील सहभाग आवश्यक आहे. न्याय काय आणि अन्याय काय याची परिभाषा करून नव्या संघर्षाची रणनीती ठरविणे अत्यंत गरजेचे आहे.

दलित साहित्यामध्ये दया पवारांपासून ते बाळकृष्ण रेणकेपर्यंत अनेक साहित्यिकांनी संघर्षाचे लोण पुढे नेले आहे. कुसुमाग्रजांच्या कवितांमधून सामान्य जनांविषयी सरकारच्या व प्रस्थापितांच्या बेदरकार असलेल्या वृत्तीची जाणीव होत गेली. आजही सर्व कार्याला, लढ्यांना या भूमीत पेरलेल्या अशा साहित्याची प्रेरणा महत्वाची वाटते, असे त्या म्हणाल्या.

एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे राहून समता व सामाजिक न्यायाचा लढा निर्णायक स्वरूपाचा ठरण्यासाठी सखोल चिंतन हवे. त्यासाठी वैचारिक साहित्यही विपुल प्रमाणात निर्माण होण्याची आवश्यकता आहे. आपल्या आयुष्याच्या मशाली पेटवून त्यांच्या भडकत्या उजेडात अभिजात वाङ्मयाची निर्मिती दलित साहित्यिकांनी केली पाहिजे, असे आवाहन करताना डॉ. वाघमारे म्हणाले की, दलित लेखकांनी आपल्या अनुभवाच्या विविध अंगांचा व आयामांचा आविष्कार आपल्या साहित्यातून करायला हवा. प्रस्थापितांच्या विरुद्धचा विद्रोह दलित साहित्यात प्रकर्षाने व्यक्त झाला आहे. ते आवश्यक होते, दलित समाज घटकांतही जाती-पोटजाती आहेत. उच्चनीचतेच्या कल्पनांनी त्या बाधित आहेत. त्या कल्पनांच्या बुडाशी काही मिथकेही आहेत. जातीयतेची तटबंदी दलित समाजघटकांमध्येसुद्धा आहे. यात स्त्रीला दुय्यम स्थान आहे. हे सर्व प्रश्न दलित साहित्यातही येणे आवश्यक आहे.

खासदार रामदास आठवले म्हणाले की, चातुवर्ण्यामुळे समाजात अन्याय वाढला. ब्राह्मण वर्गाने स्वतःच्या फायद्यासाठी चातुर्वर्ण्याची नीती आणली. हे सर्व उखडून काढून माणसामाणसाला जवळ आणले पाहिजे. आपण सारे हिंदू असू हा एकत्र येण्याचा दावा करण्याची आवश्यकता नाही. ऐंशी टक्के वर्ग आम्हा बहुजनाचा आहे. आम्हाला न्याय देत नसाल तर संघर्षाशिवाय दुसरा पर्याय नाही असेही त्यांनीही सांगितले.

## रसिकांचा आणि कवी परंपरेचा सन्मान

साहित्य अकादमीच्या पुरस्काराने जबाबदारी वाढली आहे. निसर्गाचे रूप आणि खेड्याचे उद्ध्वस्तपण हे लिहायचे राहून गेले. आता लिहिणार आहे. उत्तम तेच लिहिणार आहे. ज्या दिवशी चांगले लिहिता येणार नाही त्या दिवशी लिहिणे थांबवेन, अशी भावपूर्ण प्रतिक्रिया साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांनी व्यक्त केली. हा पुरस्कार म्हणजे रसिकांचा आणि मराठीत श्रेष्ठ कविपरंपरेचा सन्मान अशी त्यांची भावना आहे.

महानोर यांच्या 'पानझड' या कवितासंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याची बातमी आल्यानंतर अभिनंदनासाठी जळगावातील मंडळी पेढे आणि पुष्पगुच्छ घेऊन येऊ



लागली. एम. जे. कॉलेजमागील त्यांच्या निवासस्थानी अभिनंदनाचा हसतमुखाने स्वीकार करताना ते म्हणाले, छोट्या खेड्यात मी जन्मलो. जेथे पुस्तके मिळणार नाही, त्या ठिकाणी दोन अडीच हजार पुस्तके अधाशासारखी वाचली आणि अजूनही वाचत आहे. सर्वत्र प्रदूषण झाले तरी अजून निसर्गाचे प्रदूषण झाले नाही. सृष्टी शुद्धच आहे. पेरणी आणि ऋतुमान प्रत्येकवेळी नवीन असते. सौंदर्य, चराचर नवीन असते. शेतीवाडी उत्तम असली पाहिजे ही माझी भावना आहे. ही शेतीवाडी, दगडधोंड्यांची, विपरीत स्थितीत आहे. तीच स्थिती माझ्या कवितेची आहे. नवीन अंकुर घेऊन आलो.

१९६० पासून मी लिहीत आहे. गेल्या ४० वर्षाची साधना आहे. उच्चप्रतीचे लिहिले. मरगळ आली आहे. हा कवी संपला आहे अशी जी प्रतिक्रिया होती त्याला हा पुरस्कार उत्तर आहे. 'पानझड'मध्ये नवीन अंकुर घेऊन मी आलो, असे जे रसिक म्हणत होते, ते या पुरस्काराने खरे ठरले.या काव्यसंग्रहाला दीड वर्षापूर्वी केशवराव कोठावळे पुरस्कार मिळाला.

पुरस्कारप्राप्त 'पानझड' या काव्यसंग्रहाविषयी ते म्हणाले की, आयुष्यात सुखापेक्षा दुःखच मला जास्त मिळाले. यातना सहन कराव्या लागल्या. त्याची प्रतिक्रियी म्हणजे हा काव्यसंग्रह आहे. पुन्हा माझ्या कवितेला अंकुर फुटावा असे वाटते.

'पानझड' हा काव्यसंग्रह महानोर यांनी पत्नी सौ. सुलोचना यांना अर्पण केला आहे. या संग्रहाला पुरस्कार मिळाल्यानंतर त्या म्हणाल्या, खूप आनंद झाला. पळसखेड्याला त्यांच्या कवितेवर प्रेम करणारे यशवंतराव चव्हाण, पु. ल. देशपांडे, कुसुमाग्रज, रणजित देसाई हे आले होते. मला फारसे कळायचे नाही. पण त्यांच्या मैफलीत मी बसायचे. त्यांच्या कविता मला खूप आवडायच्या.

## हिलरी क्लिंटन यांच्या पुस्तकासाठी ८ दशलक्ष डॉलर

अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या पत्नी व स्वतः सिनेटर म्हणून निवडून आलेल्या हिलरी क्लिंटन 'व्हाईट हाऊस'मधील आपल्या स्मृतीवर आधारित एक पुस्तक लिहिणार आहेत. या पुस्तकासाठी हिलरी क्लिंटन यांनी ८ दशलक्ष डॉलरचा आगाऊ करारही केलेला आहे. १९९४ साली पोप जॉन पॉल (द्वितीय) यांनी पुस्तक लिहिण्यासाठी ८.५ दशलक्ष डॉलरचा आगाऊ करार करण्याचा विक्रम स्थापन केला होता. हिलरी क्लिंटन यांचा हा विक्रम मोडण्याची किंवा या विक्रमाची बरोबरी साधण्याची संधी थोडक्यात हुकली. हिलरी क्लिंटन यांचे हे पुस्तक 'सायमन अॅन्ड शुस्टर' ही प्रकाशन संस्था प्रसिद्ध करणार आहे. या अगोदरही या प्रकाशनसंस्थेने हिलरी क्लिंटन यांची पुस्तके प्रकाशित केली आहेत. हिलरी क्लिंटन या अध्यक्षांची पत्नी असतानाही सिनेटर म्हणून निवडून येणाऱ्या पहिल्या अमेरिकन महिला आहेत.

## कवयित्री 'मीरा' यांच्या 'पुनर्जन्म'ला पाच पुरस्कार प्राप्त

मेहता पब्लिशिंग हाऊसने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या वारा आणि कमळ च्या कवयित्री मीरा यांच्या पुनर्जन्म या काव्यसंग्रहाला १९९९ मधील उत्कृष्ट काव्यसंग्रह म्हणून पाच पुरस्कार प्राप्त झाले. औदुंबर संमेलन- कै. सुरेश कुलकर्णी स्मृती पुरस्कार, हा पुरस्कार मारुती चितमपल्ली यांच्या हस्ते देण्यात आला. प्रकाशनविश्वतर्फे देण्यात येणारा उत्कृष्ट काव्यसंग्रहाचा पुरस्कार वसंत बापट यांच्या हस्ते, वाङ्मचर्चा मंडळ पुरस्कार मधु मंगेश

कर्णिक यांच्या हस्ते तर गणेश पुरस्कार गोपाळराव मयेकर यांच्या हस्ते देण्यात आला.

## चौथे भारतीय सार्वभाषिक प्रकाशक संमेलन ‘कोट्टायम’ येथे संपन्न

चौथे भारतीय सार्वभाषिक प्रकाशक संमेलन ‘कोट्टायम’ येथे दिनांक ८ व ९ डिसेंबर रोजी संपन्न झाले. हे संमेलन डी. सी. बुक्स कोट्टायम यांच्या तर्फे आयोजित करण्यात आले.

या वेळी फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्सचे प्रेसिडेंट दीनानाथ मलहोत्रा, एस् .बलवंत,जनरल सेक्रेटरी शक्ती मलिक हे उपस्थित होते. त्याचप्रमाणे गुजरात विद्यापीठाचे कुलगुरू श्री. जितेंद्र देसाई, पंजाबी ॲकॅडमीचे राहुलसिंग, दिल्ली दूरदर्शनचे श्री. रमेश शर्मा, मराठी प्रकाशकसंघटनेतर्फे श्री. अनिल मेहता उपस्थित होते.


८ डिसेंबरला पसिल्या सत्रात केरळ राज्याचे सांस्कृतिक मंत्री टी. के. रामकृष्णन यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. दुसऱ्या सत्रात भारतीय भाषांतील मार्केटिंग व एक्सपोर्ट या विषयावर चर्चा झाली. तिसऱ्या सत्रामधे एका भारतीय भाषेतून दुसऱ्या भारतीय भाषेत भाषांतराबाबत चर्चा झाली. यामधे अनिल मेहतांनी भाषांतराविषयी माहिती सांगितली. मेहता म्हणाले, ‘इतर भाषांमधे काय चालले आहे, हे भाषांतरामुळे समजून येते. इतरांच्या तुलनेत आपण कोठे आहोत हे सुद्धा लक्षात येते. त्यामुळेच इतर भाषांतील पुस्तके मराठीमधे आणण्याचा उपक्रम मेहता पब्लिशिंग हाऊस सातत्याने करत आहे.’ चौथ्या सत्रात मुलांच्या पुस्तकाबाबत चर्चा झाली.

९ डिसेंबरच्या पहिल्या सत्रात आपल्या भाषेतील पुस्तके इलेक्ट्रॉनिक मिडिया या माध्यमामार्फत कशी विकली जातील याची चर्चा झाली. यावेळी डी. सी. बुक्सचे श्री. रवी यांनी स्लाइड्स दाखवून मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात भारतीय भाषांतील प्रकाशन व त्याचे भाषांतर कॉम्प्युटरच्या माध्यमातून भविष्यात कसे केले जाईल याबाबत पुण्याच्या ‘सिडॅक’चे श्री. विजयकुमार मलहोत्रा यांनी माहिती दिली. तिसऱ्या सत्रामधे कॉपिराइटबद्दलची माहिती दिनानाथ मलहोत्रा यांनी दिली.




डावीकडून अनिल मेहता, गुजरात विद्यापिठीचे कुलगुरू जितेंद्रभाई देसाई, एफ.आय.पी.चे अध्यक्ष एस् .बलवंत,डी. एन् .मलहोत्रा,प्रा. दासेगौडा व एफ.आय.पी.चे सेक्रेटरी शक्ती मलिक.






## पुस्तक परिचय

### भूमिकन्या

**डॉ. आनंद यादव**

**ग्रामीण स्त्रीजीवनातील नाट्य, कारुण्य, शोषण, अन्याय यांची विविध रूपे.**

‘भूमिकन्या’ या कथासंग्रहातील चौदाही कथा ग्रामीण महिलांच्या भावविश्वाशी निगडित असून त्यात आनंद यादव यांनी आपल्या सहृदय अंतःकरणाने स्त्रीमनातील स्पंदने हळुवारपणे टिपलेली आहेत. घरोघर स्त्रिया दारिद्र्य, अभाव, अन्याय, पुरुषी अरेरावीपणा, अंधश्रद्धा, विषमता, वेदना, शोषण, परंपरा यांना तोंड देत चिवटपणाने जगत असतात; एक पत्नी, घरधनीण, आई, सून, मुलगी, वहिनी, बहीण म्हणून अवघड कसरत जीवाच्या आकांताने करीत आपली कर्तव्ये निभावून नेत असतात. कुटुंब चालवत असतात; घराण्याची इभ्रत व परंपरा समृद्ध करीत असतात आणि आपल्या जीवनातले कारुण्य लपवून हसतमुखाने संसाराचा गाडा रेटत असतात. स्त्रीच्या कष्टावर घर चालते; पण तिला वागणूक मात्र गुलामाची वा दासाचीच मिळते. तिची सतत उपेक्षाच होत राहते. उपभोगाची वस्तू म्हणून तिच्यावर साऱ्या पुरुष वर्गाचे डोळे रोवलेले राहतात आणि जराशाही संशयाने तिच्या सगळ्या चारित्र्यावर शिंतोडे उडवायला कोणाची जीभ किंचितही अडखळत नाही. आनंद यादव यांना ग्रामीण स्त्रीची ही भीषण दुरवस्था अस्वस्थ करते; आणि त्यातही चिवटपणे जगणाऱ्या स्त्रियांबद्दल अचंबा-आदर ही वाटतो. अशाच काही स्त्रियांच्या कहाण्या त्यांना सांगाव्याशा वाटतात; आणि त्या सांगताना अपार करुणा, कणव व समंजसपणा ते दाखवतात. जीवनमूल्ये ही क्षणोक्षणी कसोटीला लागतात; लहानलहान घटनांतूनही संघर्षाच्या ठिणग्या उडत राहतात. त्यांचा मार्मिक मागोवा घेत ते आपल्या व्यक्तिरेखांचे ताणतणाव पकडू पाहतात. त्यातील प्रतीकात्मकता, आणि प्रातिनिधिकता दाखवू पाहतात. बदलत्या वास्तवाचाही पट ते खुला करीत जातात; आणि वाचकाच्या मनात विचारांचे तरंग निर्माण करण्यात यशस्वी होतात. दारिद्र्य, प्रतिकूल परिस्थिती, पुरुषप्रधान जीवनशैली यांच्याकडून होणारे आजन्म शोषण सोस सोस सोसणाऱ्या भारतीय स्त्रीच्या करुणार्द्र आणि कष्टमय जन्मास हे पुस्तक आनंद

यादवांनी समर्पण केले आहे.

आदिजन्मातली माणसं या पहिल्याच कथेत आपल्याच गावापासून दहा किलोमीटरवर राहणाऱ्या आपल्या चुलत बहिणीच्या घरी अनेक वर्षांनी जाणारा निवेदक वसंत तेथील आगतस्वागताचे वेगळेपण प्रकट करतो. या गावी जायला आजही जुनाट सनातन गाडीवाटच आहे; बैलगाडी कशीबशी तेथे जाऊ शकते. माळामुरडीनं ओढे नाले तुडवत गेल्यावर डोंगरांच्या वेड्यावाकड्या रांगा चढून उतरून गेल्यावर खबदाडीत हे गाव लागतं. दहा किलोमीटर चालत जायचं, शहरी राहणीला सरावलेल्या निवेदकाला जड वाटणारच म्हणून धट्टीकट्टी सायकल घेऊन शिकून सायेब झालेला हा भाऊ भाऊबीजेचा योग साधून बहिणीच्या गावी आदल्या दिवशी दुपारी निघून दिवस बुडता बुडता जाऊन पोचतो. चेहरा रापलेला, जळकेपणाचं टेपण त्वचेवर आलेली, कासोट्यानं कमरेभवती गच्च बसलेलं राखी रंगाचं जुनेर, डोईवरचे बिनतेलाचे झिपरे केस अशी शांता, तिची पंधरा सोळा वर्षांची लेक लक्ष्मी दारात भांडी घासत बसलेली... घराच्या दारावरच कपाळ आदळून शेकडो मुंग्या चावल्यागत झिणझिण्या येतात. लक्ष्मी वाण्याच्या दुकानातून चहा साखर आणते. शांता जुनाट डेचक्यात चुलीवर आधण ठेवते. कप व बशी तुडुंब भरून पुढे ठेवते... जेवताना पहिल्याच घासानं तोंडात वाटीभर मिरचीची भुकटी गेल्यासारखं होतं अन् उचकी लागते. तेव्हा आंबूस गूळ तोंडी लावत ताकाबरोबर आमटीभात पोटात ढकललं जातं. मायलेक दोघी मिळून दुसऱ्या दिवशी 'वसंता'ला सगळी हाडं मोडून निघतील इतकं रगडून खसाखसा आंघोळ घालतात. *(एखाद्या जनावराला धुऊन काढावं तसं त्यांनी मला मीच आणलेल्या वासाच्या साबणानं धुऊन काढलं. एवढं धुऊन काढलं तरी अंगाचा तेलकटपणा पुरतेपणी काही गेला नाही.)* प्रथम ओवाळून घ्यावं व मग ओवाळणीचा खण वगैरे घालावा असा वसंताचा विचार. पण ओवाळणीत खंड पाडायचा नसतो. दोनदा ओवाळणं अशुभ असतं. साहजिकच मध्येच उठून वसंता ओवाळणी घालतो आणि समाधानानं शांता देवापुढं ते ताट ठेवते.

वसंताला आणखी काय काय जाणवते?

-ताटलीत करंड्या टाकताना खडे पडल्यागत आवाज होतो.

-चिरमुऱ्याला तिखटमीठ लावून चिवडा केलेला असतो.

-बुंदीच्या कळ्यांचे लाडू वळेनात म्हणून तशाच कळ्या ठेवल्यात.

-झाडाखाली बांधलेला बैल थकून पांजार झालाय. *(घरादाराला तेवढाच बापय माणूस. त्येला इकला तर माझ्या दाल्ल्याला इकल्यागत हाय. मरू दे तिकडं खुट्याला.)*

वनवासातल्या पांडवांनी दिवाळी साजरी करावी तसं वसंताला वाटतं. मन उदास होतं. आपल्याच कुळीचं एक जिवंत रक्तमांस इथं अडकून पडलंय याचं वाईट वाटतं.

वसंता तिला शेतीवाडी विकून शहरात ये म्हणतो.

तर ती सांगते, ''नगं बाबा, हातचं सोडून पळत्याच्या पाठी कुठं लागू? हाय तेच निर्मळ हाय. कसंबी असलं तरी सोताचं घर हाय, पिकत नसलं तरी जाऊन बसायपुरतं सोताचं रान हाय. ह्यात मन गुंतलंय. ते कसं उकलून काढायचं? मुळं रुजल्यात, ती कशी उपडून काढता येतील आता?''



निरोप घेऊन परतताना वसंताला वाटतं, ''हजारो वर्षांपूर्वी जन्मलेल्या ह्या शिळा माणसांची रूपं घेवून गावात वावरत आहेत. त्यांचा आदिवास अजून संपलेला नाही. त्याचा पाहुणचार घेऊन आपण नव्या सुधारलेल्या जगाकडं चाललो आहोत.... एकविसाव्या शतकाकडं...''

'लेक लगनाची' या कथेतील आई आपल्या गावात गोनुगड्याकडची मुलगी बघायला आलेल्या पाहुण्यांना आपली मुलगी गौरी दाखवायचा घाट जुळवून आणते. तासाभराच्या वेळात शेजारपाजारहून लुगडी, कपबशा, पाट, भांडीकुंडी, सतरंजी वगैरे आणून घर सजवते.... मुलाकडच्या लोकांना मुलगी पसंत पडते. गौरीच्या भावाला मात्र वाटते, ''या नवऱ्या मुलाने अंगावर घातलेला कोटही कोणाचा तरी मागूनच आणलेला असावा... शेवटी खुरप्याचं लगीन खुरप्या संगंच हुणार.... गौरीच्या नशिबातला रोजगार सुटणं एकूण कठिणच!''

अशा ग्रामीण जीवनाच्या अनेक तऱ्हा या कथांमधून भेटतात. दारिद्र्यातही माणुसकीचे दर्शन होते; वासनांचे तांडव चालते; खानदानाची इभ्रत अटीतटीला पेटते. कोण बरोबर, कोण चूक हे गौण. जगणे महत्त्वाचे. ते सगळ्या चौकटींच्या पलीकडे जात आपले चिवटपण मिरवणारे!

**पृष्ठे** १४० **किंमत** : ९० रु. **सवलतीत** : ७७ रु. **सभासदांना** : ६८ रु. **पोस्टेज** :२० रु.



## आनंद यादवांच्या झपाटून टाकणाऱ्या खंडात्मक आत्मचरित्राच्या नवीन आवृत्त्या

**आवृत्ती ७वी**



**किमत : २२५रु.**
**सवलतीत :१८०रु.**
**सभासदांना : १६९रु.**
**पोस्टेज : २० रु.**

**आवृत्ती ४थी**




**किमत : १५०रु.**
**सवलतीत :१२०रु.**
**सभासदांना : ११३रु.**
**पोस्टेज : १५ रु.**

**आवृत्ती ३री**




**किमत : २५०रु.**
**सवलतीत :२००रु.**
**सभासदांना : १८८रु.**
**पोस्टेज : १५ रु.**




# स्वामी : एक शोध

**डॉ. मीरा घांडगे**

## इतिहास व ललितकृती यांची सुंदर सांगड घालणाऱ्या 'स्वामी' वरील निवडक समीक्षा-लेखांचं संकलन.

मराठी ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या परंपरेत एक नवा टप्पा निर्माण करण्याचे श्रेय लाभलेली रणजित देसाई यांची स्वामी ही कादंबरी १९६२ साली प्रसिद्ध झाली. गेल्या ३८ वर्षांत या कादंबरीच्या एकवीस आवृत्त्या निघाल्या. मध्यंतरी १९७३ ते १९८१ दरम्यान हे पुस्तक उपलब्ध नव्हते. नाहीतर आवृत्त्यांची संख्या आणखी वाढली असती. 'स्वामी' ने रणजित देसाई यांचे एक लोकप्रिय लेखक म्हणून मराठी सारस्वतात स्थान निश्चित केले; त्याचप्रमाणे इतिहासातील गाजलेल्या व्यक्तींमधील माणूस शोधण्याच्या प्रक्रियेला चालना दिली. १९६२ मध्येच 'रायगडाला जेव्हा जाग येते' या वसंत कानेटकरांच्या नाटकाचाही पहिला प्रयोग झाला. त्यातही नेमका हाच प्रयत्न केला गेला होता. या दोन्ही पुस्तकांवर त्या वेळी पहिल्या प्रथम लिहिले ते शंकर सारडा यांनी ! 'महाराष्ट्र टाइम्स' च्या रविवार पुरवणीत (दि. ९ डिसेंबर १९६२) त्यावेळी 'स्वामी' बद्दल त्यांनी म्हटले होते, ''नव्या जाणिवा, नव्या कलात्मक श्रद्धा बाळगणारे वसंतराव कानेटकर यांनी रायगडला जेव्हा जाग येते मध्ये शिवाजी व संभाजी यांच्यातील पितापुत्र संबंधांचे स्वरूप शोधण्याचा जसा प्रयत्न केला आहे तसाच माधवरावांच्या समग्र व्यक्तित्वाचा आणि त्या संदर्भात पेशवाईचा शोध घेण्याचा हा देसायांचा प्रयत्न आहे. कुठलीही व्यक्ती ही अखेर एकाकी असते ही या युगात अनुभवाला येणारी जाणीव– तीच शिवाजी व माधवराव यांच्या जीवनाला लागू करून, त्यांच्या यशापयशाचा हिशेब रूढ पद्धतीपेक्षा वेगळ्या तऱ्हेने मांडण्याचा हा प्रयास महत्त्वाचा आहे. वृद्ध खांडेकरांना 'ययाति'मध्ये जे जमले नाही, ते कानेटकर- देसाई या नव्या पिढीतील नव्यांनी साध्य करून दाखवले आहे; आणि तेही बहुतांशी मराठी नाटक-कादंबरीच्या रूढ परंपरांना फारसा धक्का न लावता! ही साधना काही सामान्य नव्हे.'' या पुस्तकात आरंभीच हा लेख आहे.

'स्वामी' वर झालेल्या समीक्षात्मक अशा २१ लेखांचे संकलन करणारे 'स्वामी : एक



शोध' हे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसने नुकतेच प्रकाशित केले आहे. या २१ लेखांमध्ये आचार्य अत्रे, प्रा. दि. के. बेडेकर, प्रा. नरहर कुरुंदकर, प्रा. स. गं. मालशे, प्रा. म. वा. धोंड, डॉ. द. भि. कुलकर्णी, डॉ. पंडित आवळीकर, प्रा. यशवंत पाठक, प्रा. द. ता. भोसले वगैरेंचे लेख आहेत. अरविंद याळगी यांचे तीन लेख आहेत. (स्वामी– एक संस्कारकारी कलाकृती, ऐतिहासिक कादंबरी, आणि प्रसंगचित्रांच्या स्वरावळीत साकारलेला अभोगी). त्या शिवाय रणजित देसाई यांच्या तीन मुलाखती, मनोगत, आणि रणजित देसाई यांच्याबद्दलचे विजया राजाध्यक्ष, प्रल्हाद वडेर व व. ह. पिटके यांचे लेख असे साहित्यही या पुस्तकात आहे.

'स्वामी' व 'स्वामीकार' या दोहोंबद्दलचे हे अभ्यासपूर्ण संकलन डॉ. मीरा घांडगे यांनी सिद्ध करून अभ्यासकांची मोठीच सोय साधलेली आहे. १९६२-६३ पासून ते १९९८ पर्यंतचे हे लेख कालानुक्रमे दिलेले आहेत; त्यामुळे 'स्वामी'कडे पाहण्याच्या दृष्टिकोनात व मूल्यमापनात कसकसा बदल होत गेला याचाही मागोवा घेता येतो. 'स्वामी' च्या लोकप्रियतेची दखल सर्वांनाच घ्यावी लागली आहे; आणि तिचे जे वाचकांना झपाटून टाकण्याचे सामर्थ्य आहे ते सर्वांनाच दोष दाखवूनही मान्य करावे लागलेले आहे.

डॉ. मीरा घांडगे यांनी आपल्या प्रस्तावनेत स्वामीची निर्मितीप्रक्रिया, स्वामी व इतिहास, स्वामी व भाषा, स्वामीची वर्णनशैली, स्वामीवरील आक्षेप, स्वामीमधील रमा-माधव, स्वामीची लोकप्रियता, या मुद्द्यांचा परामर्श घेतला आहे. स्वामीच्या युगकर्तृत्वाचे श्रेय त्यांनी तत्कालीन सामाजिक-राजकीय परिस्थितीपेक्षा माधवरावांच्या जीवनात नियतीने साधलेल्या दैवदुर्विलासातून दिसणाऱ्या कालातीत शोकात्मिकेला दिले आहे. ''मानवी जीवनातून उद्भवलेल्या सुखदु:खाचा, उत्कर्ष-अपकर्षाचा, प्रेमद्वेषाचा, ऐश्वर्य-विनाशाचा व यांसारख्या अनेक जीवनघटकांचा अतिशय खोलवर विचार करण्यास भाग पाडणारी स्वामी ही कादंबरी व्यक्ती विरुद्ध नियती हा संघर्ष दाखवून त्यातून व्यक्तीच्या जीवनात येणारी नैराश्य व नश्वर, निरर्थकता व क्षणभंगुरता यांची जाणीव प्रकट करून, नियतीच्या सरशीने जाणवणारी विषण्णता आणि उद्विग्नता आविष्कृत करते.

'स्वामी'तील रमा-माधव संबंधांचे चित्रण ही रणजित देसाई यांची प्रतिभेची निर्मिती म्हणावी लागेल. माधवरावांचे कर्तृत्व इतिहासात नोंदवले गेले आहे, परंतु रमाबाईंचे सात्विक व समर्पणशील सहजीवन रणजित देसाई यांच्या कल्पकतेतून वाचकांपुढे आले आहे. रमाबाई सती जातात ही घटना रणजित देसाई कमालीच्या संवेदनशीलतेने उभी करतात. रमा-माधव यांच्यातील प्रेमचित्रण हे रोमॅंटिक पातळीवर नेल्याबद्दल रणजित देसाई यांच्याबद्दल अनेकांनी नाके मुरडली आहेत; परंतु या कादंबरीच्या आवाहकतेत या प्रेमचित्रणाचा मोठा वाटा आहे यात संकाच नाही. रमाबाईचे व्यक्तिमत्त्व ही रणजित देसाई यांच्या प्रतिभेची साक्ष आहे आणि काही प्रसंगात तर रमाबाई माधवरावांपेक्षाही मोठी असल्याची भावना वाचकाच्या मनावर ठसते. सतीचा प्रसंग हा कादंबरीचा क्लायमॅक्स आहे.

प्रा. यशवंत पाठक यांनी ''रमाबाईंच्या सतीत्वाने कादंबरीतील सर्वच व्यक्तिरेखा अखेरच्या प्रकरणात लुप्त होतात, माधवरावांचा मृत्यू हा मोठा आघात वाटण्याऐवजी रमाबाईंचे सती

जाणे हे लेखकाला मोठे वाटते'' असा आक्षेप नोंदवला आहे; तर म. श्री. दीक्षित यांना कादंबरीतील खानदानी दांपत्यजीवनातील नर्म पण प्रौढ स्वरूपाच्या शृंगारतुषारांनी शोभा आणली आहे असे वाटते. रमा-माधवाचे रुचिर सांसारिक जीवन व दोनचार अन्य प्रसंग सोडले तर या कादंबरीत संशोधकबुद्धीच्या इतिहासकारालाही अवास्तव असे काही आढळणार नाही असेही त्यांनी म्हटले आहे. (२७) आचार्य अत्रे यांनीही म्हटले आहे, ''या पुस्तकाचा उल्लेख कादंबरी असा करणे योग्य होणार नाही. कारण तिच्यात कपोलकल्पित असे काहीसुद्धा नाही. सर्व पात्रे, प्रसंग आणि घटना इतिहासाच्या कसोटीवर घासून चितारलेली आहेत. पण ती चितारताना लेखकाने आपल्या लेखन-लालित्याचे, भाषावैभवाचे आणि उत्तुंग प्रतिभेचे असे काही गगनचुंबी दर्शन घडविलेले आहे की आपण कादंबरी वाचतो आहोत, नाटक पाहतो आहोत वा एखादा चित्रपट बघतो आहोत असा भ्रम झाल्यावाचून राहणार नाही. इतिहास आणि साहित्य यांचे एवढे ऊर्जस्वल नि रोमहर्षक रसायन मराठी भाषेत आजतागायत कोणीही निर्माण करू शकलेले नाही. स्वामी वाचून वाचक दिपून जातो, दिङ्मूढ होतो, बेहोश होतो. शेवटी तर त्याच्या भावना थिजून जातात आणि मेंदू सुन्न होतो. अलीकडच्या काळात एवढे प्रभावी व जबरदस्त मराठी लिखाम आम्ही तरी वाचलेले नाही.''

स्वामीची भाषा आधुनिक आहे; इतिहास व वर्तमान यांचा भावबंध जुळवणारी आहे. प्रा. म. वा. धोंड यांनी पेशवेकालीन भाषेचे सामर्थ्य विशेष रणजित देसाई यांनी जाणून न घेतल्याबद्दल ठपका ठेवला आहे. पात्रांच्या तोंडची इंग्रजी धर्तीची वाक्ये त्यांना खटकतात. परंतु आहे त्या स्वरूपातही ही भाषा ऐतिहासिक वातावरण निर्मिती करते तसेच इतिहासातील व्यक्तींच्या भावविश्वात वाचकांना सहजपणे नेऊ शकते हेही नाकारण्याचे कारण नाही.

स्वामीवरील मुख्य आक्षेपांची नोंद प्रा. घांडगे यांनी पृष्ठ ८-९-१० वर केली आहे.

१. प्रा. श्री. मा. कुलकर्णी– माधवरावांचे कादंबरीत दिसणारे दुहेरी, दुभंगलेले व्यक्तिमत्त्व शक्य आहे का?

२. दमयंती पांढरीपांडे– व्यक्तिरेखा इतिहासाशी इमान राखतात, रेखीव आखीव आहेत. परंतु महान व विशाल वाटत नाहीत.

३. डॉ. द. भि. कुलकर्णी– सर्व पात्रे, सर्व कादंबरी फक्त काळ्या-पांढऱ्या रंगातील झाली आहे. शोकात्म वाङ्मयातील तात्त्विक व वैचारिक कस स्वामीला लाभलेला नाही.

४. प्रा. नरहर कुरुंदकर– समोर घडणाऱ्या घटनांचा अन्वयार्थ लावण्याची माधवरावांची शक्तीच थोडीशी थिटी पडते

५. शं. गो. राजवाडे– सामाजिक, धार्मिक जीवनाविषयी लेखकाने फारसे लिहिलेले नाही. त्यामुळे कादंबरी भारदस्तपणात कमी पडली.

६. प्रा. यशवंत पाठक– रमाबाईंच्या सतीत्वाने कादंबरीकारास एवढे घेरले आहे की कादंबरीतील अन्य व्यक्तिरेखा अखेरच्या प्रकरणात लुप्त होतात. हे स्वामीचे अपयश आहे.



७. द. ता. भोसले– पेशवाईचे वातावरण नीटसे दाखवलेले नाही. माधवरावांचे व्यक्तिमत्त्व पुरेसे चिंतनशील नाही.

८. डॉ. विभा शहा– माधरावांचे व्यक्तिचित्रण मनोविश्लेषणात्मक वा वैचारिक स्वरूपाचे झालेले नाही. शेवटच्या आजारात रमेच्या सहवासाची उत्कट ओढ वाटत असताना अपत्याचा विचार त्यांच्या मनात येणे व तो सूचकपणे व्यक्त होणे स्वाभाविक नव्हते का?

या आक्षेपात काही तथ्य असले तरी 'स्वामी'चे एकूण आवाहन आज आहे त्या स्वरूपातही इतके जबरदस्त आहे की वाचकांना ती झपाटून टाकते.

'स्वामी' का गाजली याचे विश्लेषण यापुढेही होत राहील.

स्वत: रणजित देसाई यांनी आपली या लेखनामागची भूमिका स्पष्ट करणारे मनोगत 'मनोहर' च्या १९६३ च्या दिवाळी अंकात लिहिले होते. तेही या संकलनात आहे. त्यात स्टिफन झ्वाइगची 'मेरी स्टुअर्ट क्वीन ऑफ स्कॉट', 'मेरी अँटोनेट' ही चरित्रे आपल्यासमोर होती; ती ज्या जिव्हाळ्याने व इतिहासाशी प्रामाणिक राहून लिहिली गेली होती, त्याच प्रामाणिकपणाने ही कादंबरी लिहायची असा निर्धार त्यांनी प्रकट केला आहे. रमाबाईबद्दल इतिहासात फारशी माहिती उपलब्ध नव्हती; त्यामुळे हे एकच पात्र असे होते की ज्यावर आपण पूर्म विचार केला; जसजसे तिचे रूप स्पष्ट होत गेले तसतसे माधवरावांचे व्यक्तिमत्त्व अधिक उलगडत गेले आणि कादंबरी लिहिण्याचा आत्मविश्वास वाढला. ते आपल्या यशाचे श्रेय रमेला देतात. रणजित देसाई हे लेखन परिपूर्ण व्हावे, मनासारखे व्हावे म्हणून भरपूर मेहनत घेत. पुनर्लेखनाचा कंटाळा त्यांना नव्हता. स्वामीचे पहिले लिखाण त्यांना पुरेसे समाधानकारक वाटले नाही. दुसऱ्यांदा ती लिहिली. नंतर तिसऱ्यांदा लिहिली. अनेक तपशील व प्रसंग विस्तारभयास्तव वगळले. नऊशे पृष्ठांची कादंबरी पुनर्लेखनात निम्मी झाली. नव्या लेखकांनी रणजित देसाई यांचा आदर्श समोर ठेवायला हवा. एकदा लिहिले की झाले असे म्हणून स्वत:चीच पाठ थोपटत राहिल्याने काहीही पदरी पडत नाही. चिकित्सकपणे आपल्या लेखनाचा स्वत:शीच अंतर्मुख होऊन विचार करून, मनासारखे उतरेपर्यंत पुन:पुन्हा लिहिणे याला पर्याय नाही. परिश्रमात कमी पडता कामा नये. तीन-चारदा लिहूनही रणजित देसाई म्हणतात, ''कादंबरी छापावयास सुरुवात झाली; पण तिच्या यशाची खात्री मला अथवा प्रकाशकांना नव्हती. इतिहासाशी प्रामाणिक राहून लिहिलेली कादंबरी एवढे वेगळेपण आम्हांला जाणवले होते. तिच्या भावी यशाबद्दल आम्ही साशंकच होतो... कादंबरी बाजारात आली. परीक्षणे येऊ लागली. शेकडो रसिक वाचकांची पत्रे आली.. हे सारे पाहण्यात समाधान होते हे नाकारण्यात काहीच अर्थ नाही.. हे जरी झाले तरी कादंबरी क्षेत्रात अजून मी नवीन आहे, याची मला जाणीव आहे.'' असा नम्रपणा व प्रांजलपणा दुर्मिळच! 'स्वामी'च्या व रणजित देसाई यांच्या चाहत्यांना या पुस्तकामुळे त्यांच्या महत्तेचे अनेक पैलू नव्याने उजळून आलेले दिसतील.

**पृष्ठे** २१२ **किंमत** : १५० रु. **सवलतीत** : १२०रु. **सभासदांना** : ११३ रु. **पोस्टेज** :१५रु.




# रेकी

**शुभदा दामले**

## शारीरिक व मानसिक व्याधी समूळ नाहीशा करणारी अद्‌भूत उपचार पद्धती

रेकी ही एक अद्भुत उपचार पद्धती आहे. ॲलोपथी, होमियोपॅथी, आयुर्वेद, युनानी, ॲक्युप्रेशर, चुंबकचिकित्सा, निसर्गोपचार यांच्यापेक्षा सोपी, घरच्या घरी वापरात आणता येईल अशी, कुठल्याही साधनसामग्रीची गरज नसलेली अशी 'रेकी' शारीरिक व मानसिक व्याधींचे निवारण करू शकते असा अनेकांचा अनुभव आहे. रेकी ही स्वयंभू विद्या आहे. तिचे कार्य नेहमी सकारात्मकच असते. जपानमधील डॉ. मिकाओ उसई यांनी १९ व्या शतकात 'रेकी'चे पुनरुज्जीवन केले. लामा, भिक्षू यांच्यापर्यंतच सीमित असलेली ही विद्या सर्वांसाठी खुली केली. रे म्हणजे विश्व. की म्हणजे प्राण. ऊर्जाशक्ती चैतन्य.

**रेकीच्या अभ्यासक्रमात पुढील बाबींचा समावेश होतो.**

(१) रेकीचे तत्त्वज्ञान
(२) रेकीची दीक्षा (ॲट्युनमेंट)
(३) शरीरांतर्गत क्रियांवर नियंत्रण ठेवणाऱ्या सात प्रमुख ऊर्जाचक्रांचे ज्ञान
(४) व्याधींचे प्रकार. त्यांचा विशिष्ट इंद्रियांशी असणारा संबंध
(५) मानसिक आजारांशी संबंधित शरीराचे भाग
(६) रेकी-उपचारपद्धती

**रेकीमुळे होणारे फायदे अनेक आहे. त्यापैकी काही.**

(१) रेकीमुळे मन आल्हाददायक, शांत, प्रसंन्न राहते. मानसिक विकार आणि भावनोद्रेक यावर नियंत्रण ठेवता येते.



(२) रेकीमुळे शरीरातील ऊर्जा संतुलित होते. रोगप्रतिकारक शक्ती वाढते.
(३) रेकीमुळे शरीरातील हानिकारक द्रव्ये बाहेर टाकली जातात.
(४) शरीरांतर्गत प्रवाहांमधील अडथळे दूर होतात. (रक्तप्रवाह, रसायन प्रवाह, प्राणवायू प्रवाह इ.)
(५) रेकीमुळे आध्यात्मिक व आत्मिक उन्नती साधता येते.
(६) रेकीचा प्रयोग पशुपक्ष्यांवर वनस्पतींवर देखील करता येतो.
(७) मुलांना आपले दुखणे सांगता येत नाही. रेकीमुळे त्यांच्याही दुखण्याचा बंदोबस्त होऊ शकतो.
(८) गरोदरपणी रेकी घेतली तर प्रसूती सुलभ होते. स्तनपान करताना बाळाला रेकी दिल्यास त्याचे उत्तम पोषण होते.
(९) रेकीद्वारे अल्पकालीन, दीर्घकालीन तसेच विविध शारीरिक यंत्रणांशी संबंधित आजार दूर होऊ शकतात. (पचनसंस्था, यकृत, श्वसनसंस्था, रक्ताभिसरण संस्था, जननेंद्रिय संस्था, ज्ञानतंतू यंत्रणा.)

भौतिक शास्त्राप्रमाणे जगातील प्रत्येक वस्तूला जडत्व असते; ती अणू-परमाणूंनी बनलेली असते. या प्रत्येक अणूपरमाणूत ऊर्जा असते. विचार व भावना यांच्या आघाताने प्राणशक्तीवर विपरीत परिणाम होतो. माणसाचे शरीर हे वैश्विक प्राणशक्तीने प्रभारित असते. त्यातून शक्तीच्या लहरी वाहत असतात.

शरीरात सात ऊर्जाचक्रे असतात. रेकीमध्ये या ऊर्जाचक्रांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, आज्ञा व सहस्त्रार अशी ही चक्रे पाठीच्या कण्याला जोडून खालून पाठीच्या कण्याच्या माकडहाडापासून तो मेंदूच्या वरच्या भागापर्यंत ऊर्जा प्रवाह वाहून नेत असतात. या चक्रांच्या ठिकाणी असलेल्या ग्रंथींच्या रसायनांवर शरीरांतर्गत अनेक कार्ये अवलंबून असतात. तसेच ही ऊर्जाचक्रे आणि माणसाच्या भावभावना यांचाही निकटचा संबंध असतो.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मूलाधार चक्र | मूत्रपिंड, मूत्राशय, गुदद्वार | सुप्रारिनल ग्रंथी |
| २) | स्वाधिष्ठान चक्र | जनेंद्रिये | ओव्हरीज, टेस्टीज |
| ३) | मणिपूर चक्र | जठर, यकृत, पित्ताशय | ॲड्रिनल, पित्ताशय, |
| ४) | अनाहत चक्र | हृदय, फुफ्फुसे, रक्ताभिसरण | थायमस |
| ५) | विशुद्ध चक्र | गळा, घसा, फुफ्फुसे | थॉयराइड, पॅराथॉयमराइड |
| ६) | आज्ञाचक्र | मेंदू, नेत्र, चेतासंस्था | पिट्युटरी |
| ७) | सहस्त्रार चक्र | मेंदू | पीतिमल |

रेकीचा अभ्यासक्रम तीन टप्प्यात (डिग्रीत) विभागलेला आहे.
पहिल्या टप्प्यात हात ठेवून स्पर्शाने उपचार करण्याची पद्धत शिकवली जाते.
दुसऱ्या टप्प्यात थॉयराइड ग्रंथींवरच्या ऊर्जाचक्राचे द्वार उघडले जाते.

तिसऱ्या टप्प्यात पीनिमल, हायपोथॅलॅमस ग्रंथींवर संस्कार केले जातात. तिसऱ्या डिग्रीनंतर संपूर्ण शरीर वैश्विक प्राणशक्तीचे एक प्रकारचे केंद्र बनते.

रेकीची पहिली डिग्री घेतल्यावर २१ दिवस दररोज रेकी घेणे जरुरीचे असते. ह्या कालावधीत शरीराच्या सर्व केंद्रांवर रेकी घेतल्याने आत्मशक्ती वाढते. अशुद्ध घटक शरीराबाहेर पडतात.

त्यानंतर दुसऱ्या डिग्रीच्या शिबिरात शरीराच्या मधल्या भागातल्या काही चक्रांचे विश्वऊर्जेशी नाते जोडले जाते. ही चक्रे कार्यान्वित झाली म्हणजे साधकाची ऊर्जाशक्ती चौपट वाढते. या डिग्रीनंतर प्रत्यक्ष स्पर्श न करता चिन्हांच्या सहाय्याने उपचार करण्याच्या पद्धती शिकवल्या जातात. चो-कु-रै, से-हे-की व हॉन शा झे शो नेन् अशी ह्या चिन्हांची नावे आहेत. त्यामुळे दूर असणाऱ्या व्यक्तीवरही रेकीचे उपचार करता येतात.

तिसऱ्या डिग्रीत पीनिमल तसेच हायपोथॅलॅमस ग्रंथींवर संस्कार केले जातात. तेथील ऊर्जा ग्रहण करण्याची प्रवेशद्वारे उघडली जातात. किमान तीन वर्षे स्वत:वर व इतरांवर रेकीचे उपचार केल्यावरच तिसऱ्या डिग्रीकडे वळावे. रेकीचा गुरू होण्याची इच्छा असणाऱ्यांनीच तिसरी डिग्री करावी असे सांगण्यात येते. रेकीची दीक्षा गुरुशिष्य परंपरेने दिली जाते. विश्वऊर्जेला आवाहन करून गुरू त्या ऊर्जेचा ओघ शिष्यापर्यंत आणतो. दोन बोटांनी शिष्याच्या शरीरातील ऊर्जा चक्रांवर चिन्हे ठसवली जातात. शरीराला प्रत्यक्ष स्पर्श न करता एकदोन इंच अंतरावरून ही चिन्हे काढली जातात.

रेकी ही औषधे व वैद्यकीय उपचारांना पूरक आहे असे मानावे. रेकीची दीक्षा घेतलेला हा रेकीचा फक्त वाहक असतो. रेकीवर व गुरूवर विश्वास असेल तरच तिचा प्रभाव जाणवतो. रुग्णाला पूर्ण विश्वासात घेऊनच उपचार करावे. रेकी देताना व घेताना शारीरिक ताण असू नये. आरामदायक आसन असावे. सर्व केंद्रांना रेकी देण्यासाठी एक तास तरी लागतो. टेबलावर रुग्णाला झोपवावे. टेबलाभोवती फिरून रेकी द्यावी. उंच स्टुलावर बसून रेकी देणे सोयीचे ठरते. रेकी कुठेही देता घेता येते. विशिष्ट स्थळच हवे असे नाही. रेकीचे तंत्र आत्मसात करण्यासाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त आहे.

**पृष्ठे** ८६ **किंमत** : ६० रु. **सवलतीत** : ५१ रु. **सभासदांना** : ४५ रु. **पोस्टेज** :१५ रु.


**विविध विकारांवर उपचार करणाऱ्या अजून एका उपचार पध्दतीचं मार्गदर्शन करणारे पुस्तक**

नवीन आवृत्ती

एकच पेला शिवाम्बूचा

अनेकानेक व्याधिग्रस्तांना निरामय आयुष्य बहाल करणारा मूत्रमय निसर्गोपचार!

**किंमत** : ९० रु. **सभासदांना** : ६८रु. **पोस्टेज** : १५रु.




# स्वभावाला औषध आहे

**डॉ. रमा मराठे**

## आपण आपल्या स्वभावातील गुणदोषांकडे बघायला तयार आहोत का?

वाचकहो, पुढे काही प्रश्न देत आहोत. त्यांची खरीखुरी उत्तरे पुढे दिलेल्या कंसात बरोबर किंवा चूक अशी खूण करून नोंदवा. त्यानंतर पुढील मजकूर वाचा. (म्हणजे त्या मजकुराचे खरे महत्त्व लक्षात येईल.)

१) कोणतीही गोष्ट करताना मनाची द्विधा अवस्था होते का? (होय/नाही)

२) तुम्ही हसतमुखाने समाजात वावरता, पण मनातले दु:ख कधी बाहेर दाखवत नाही. (होय/नाही)

३) तुम्ही तुमच्या दु:खाबद्दल, अपयशाबद्दल इतरांना दोषी धरता का? (होय/नाही)

४) मुलगा/मुलगी वा अन्य कोणी काही कामानिमित्त बाहेर गेले व वेळेत परतण्यास त्यांना उशीर झाला तर तुम्ही काळजी करता का? (होय/नाही)

५) जे काही बरे-वाईट घडते त्याबद्दल तुम्ही स्वत:लाच अपराधी किंवा दोषी धरता का? (होय/नाही)

६) लहान-सहान अपयशानेही तुम्ही खचून जाता का? (होय/नाही)

७) आपल्यावरच सर्व कामांची जबाबदारी आहे असे तुम्ही समजता का? (होय/नाही)

८) कुठलेही काम करायची पाळी आली तर तुम्ही ते लांबणीवर टाकण्याचा कळत-नकळत प्रयत्न करता का? (होय/नाही)

९) पुढे काय होईल याबद्दलची काल्पनिक भीती तुम्हाला वाटते का? गाडी

वेळेवर मिळेल का? अपघात तर होणार नाही ना? विमान कोसळले तर? स्कूटर वाटते पंक्चर झाली तर? इ. इ. (होय/नाही)

१०) कुठलेही काम करायचा उत्साहच तुम्हाला नसतो. जीवावर आल्यासारखे प्रत्येक काम तुम्हाला वाटते का? (होय/नाही.)

११) एकटे राहण्याची तुम्हाला धास्ती वाटते का? (होय/नाही)

१२) लोकांना भेटणे, त्यांच्यात मिसळणे ही गोष्ट तुम्हाला टाळावीशी वाटते का? (होय/नाही)

१३) आपण बरे आपले काम बरे, इतर कुणाशी आपले काहीही देणे-घेणे नाही; आपले दु:ख आपल्याशीच ठेवता का? (होय/नाही)

१४) काहीही नवे काम करण्याची वेळ आली तर भूतकाळातील दु:खद आठवणी येऊन औदासीन्य येते का? काळजी वाटते का? (होय/नाही)

१५) आपली स्वत:ची काही ठाम तत्त्वे ठरवून ती तुम्ही प्राणपणाने पाळता का? त्यात प्रसंगानुरूप बदल करणे तुम्हाला बदल करणे तुम्हाला जड जाते का? आपली तत्त्वे इतरांवर लादता का? (होय/नाही)

१६) हे सगळे माझ्या सहनशक्तीच्या पलीकडचे आहे असे तुम्हांला कधी वाटते का? (होय/नाही)

१७) उंच इमारतीवरून खाली पाहताना तुम्हाला भीती वाटते का? अंधाराची भीती वाटते का? आपण कुठल्यातरी गंभीर आजाराने आजारी आहोत अशी शंका येत राहते का? (होय/नाही)

१८) हे काम आपल्या आवाक्याबाहेरचे आहे असे समजून ते करण्याचे तुम्ही कटाक्षाने टाळता का? ते करण्याचा आत्मविश्वास वाटत नाही असा याचा अर्थ होतो का? (होय/नाही)

१९) कुठलेही काम करताना ते उतावीळपणे भरभर करण्याचा तुमचा स्वभाव आहे का? जराही वेळ गेलेला तुम्हाला खटकतो का? (होय/नाही)

२०) तुम्हाला नेहमी थकल्यासारखे, दमल्यासारखे वाटते का? गळून गेल्यासारखे वाटते का? (होय/नाही)

वाचकहो, या प्रश्नांची उत्तरे तुम्ही होय किंवा नाही यावर खूण करून दिली असतीलच. तर आता पुढील मजकूर वाचा.

तुम्ही म्हणाल, ह्या गोष्टी आमच्या स्वभावाशीच निगडीत आहेत. आम्ही काळजी करतो, ठाम तत्त्वे पाळतो, कामाची कधीकधी टाळाटाळ करतो, इतरांवर दोषांचे खापर फोडतो इ. इ. माणसे अशीच असतात. अशीच वागतात.

डॉ. एडवर्ड बाख यांचे मत मात्र असे आहे की या सर्व गोष्टी एकेकाचा स्वभाव म्हणून स्वीकारणे व जन्मभर त्यांचा त्रास सहन करणे चूक आहे. या सर्व गोष्टी मानसिक व्यथेच्या (सायकोसोमॅटिक डिसऑर्डर्स) स्वरूपाच्या आहेत; आणि त्यातून शारीरिक व्याधींचेही प्रमाण वाढते. दमा, पेप्टिक अल्सर, मधुमेह, हृदयरोग, अतिसार, मलावरोध, उच्च रक्तदाब,



संधिवात, त्वचारोग वगैरे सर्व रोग हे मानसिक तणावांमुळे वाढतात; आणि मानसिक स्थिती सुधारल्यास ह्या आजारांची तीव्रता कमी होते; तसेच ते बरेही होऊ शकतात. अर्थात काही व्याधींनी शरीराचे विशिष्ट अवयवच ग्रस्त झालेले असतात तेव्हा केवळ मानसिक स्थितीच्या सुधारणेचा प्रभाव पुरेसा नसतो हेही लक्षात घेणे जरूरीचे आहे. डॉ. बाख यांनी या स्वभावविशेषांना मानसिक आजार मानतात आणि त्यावर उपचारांसाठी त्यांनी वृक्षवनस्पतींच्या फुलांपासून औषधे तयार केली. ही औषधे फ्लॉवर रेमिडीज् (पुष्पौषधी) म्हणून ओळखली जातात. ही औषधे एकूण ३९ आहेत. त्यातील एक रॉकवॉटर हे पाषाणजलापासून तयार केलेले आहे. दुसरे एक पाच औषधांचे मिश्रण आहे. (रेस्क्यू रेमिडी). उरलेली ३७ औषधे फुलांपासून बनलेली आहेत. ही सर्व औषधे रुग्णाच्या मानसिक स्थितीच्या अनुषंगानेच दिली जातात. रुग्णाची तक्रार मानसिक असो वा शारीरिक; शरीर रोगानुकूल होण्याआधी त्याचे मन प्रथम रोगाला बळी पडते हा डॉ. बाख यांचा मूलभूत सिद्धान्त आहे. मन:स्थिती, स्वभाव, मनाच्या जखमा, वेदना व त्यांचे शरीरावर होणारे परिणाम यांचा विचार करून या औषधांचा वापर केला जातो. त्यांचा फायदा अनेकांना झालेला आहे. होत आहे. त्यामुळे होमिओपॅथीतले हे पुष्पौषधीचे दालन सध्या खूप महत्त्वपूर्ण ठरले आहे. आपण विशिष्ट प्रकारे वागतो, काळजी करतो. घाबरतो, कामाची टाळाटाळ करतो हा आपल्या स्वभावाचा भाग म्हणून स्वीकारण्याऐवजी आपल्या अशा वागण्याने स्वत:ला व इतरांना होणारा त्रास टाळता येतो; त्यासाठी पुष्पौषधीचा वापर प्रभावी व आवश्यक ठरतो हे प्रथम ठामपणे पटवून घ्यायला हवे.

हे एकदा आपल्या मन:पटलावर बिंबले तर नेमकी पुष्प-औषधे घेऊन आपल्या अनेक ताणतणावांपासून स्वत:ला मुक्त करणे तुम्हाला शक्य होईल.

या पुष्पौषधींची माहिती देणारे ‘स्वभावाला औषध आहे’ हे पुस्तक तुम्हाला खूपच उपयुक्त ठरेल. आपल्या स्वभावातील अनेक घटकांचा उलगडा त्यामुळे होऊ शकेल; आणि आपले विशिष्ट प्रकारचे वर्तन जर स्वत:ला व घरच्यांना खटकत असेल तर त्यात बदल घडवून आणण्याचा आत्मविश्वास व निकड तुम्हांला जाणवू लागेल. पुष्पौषधींची योजना होमिओपॅथीच्या डॉक्टरांच्या सल्ल्याने करता येईल. काही न्यूरॉसिसच्या मनोविकारांवर स्वत:च औषधे वापरण्याचा निर्णय घेता येईल. सायकोसिस प्रकारच्या मनोविकारांबाबत तज्ज्ञांचा सल्ला घेणे इष्ट असे डॉ. रमा मराठे यांनी प्रस्तावनेत मुद्दाम सुचवले आहे.

डॉ. रमा मराठे या बेळगावच्या एका होमिओपॅथिक कॉलेजमध्ये अध्यापन करतात. तसेच मराठे हेल्थ केअर व प्रेरणा आत्मविश्वास केंद्र चालवतात.

या लेखाच्या आरंभी दिलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर हो किंवा नाही असे असले तरी ते मानसिक समस्येचेच निदर्शक आहे; फक्त प्रमाण कमीजास्त असेल हे लक्षात घेतले तर उपाययोजनेची गरजही लक्षात येईल.

१. अंतरीचे दु:ख लपवून हसऱ्या चेहऱ्याने समाजात वावरणे– ॲग्रीमनी.

२. अज्ञात कारणामुळे भीती वाटत राहणे– आस्पेन.

३. इतरांवर सतत चिडणे, रागावणे, दोषारोप करणे, वर्चस्व गाजवणे– बीच.

४. इतरांचे वर्चस्व मान्य करून स्वत:चे व्यक्तिमत्त्व हरवून बसणे– सेंच्युरी

५. स्वत:ची विशिष्ट मते असणे पण स्वकर्तृत्वावर विश्वास नसल्याने इतरांच्या दडपणाला बळी पडणे– सिरॅटो
६. दु:खाच्या आघाताने कोलमडून आत्मघाताचा विचार मनात घोळवणे– चेरी प्लम
७. त्याच त्या चुका पुन:पुन्हा करीत राहणे– चेस्टज बड
८. दुसऱ्या व्यक्तीच्या बारीक-सारीक गोष्टींवर लक्ष ठेवून अंमल गाजवणे–चिकोरी
९. अवतीभवतीच्या वास्तवाकडे दुर्लक्ष करून स्वत:च्याच जगात वावरणे– क्लिमॅटिस
१०. एखाद्या दोषाबद्दल स्वत:ला जबाबदार धरून, त्यापासून स्वत:ला मुक्त करण्यासाठी झटणे, स्वत:ला मलिन मानून स्वच्छतेचा अतिरेक करणे– क्रॅब ॲपल
११. आपल्या जबाबदारीचे उत्तम प्रकारे पालन करताना थकव्याची भावना जाणवणे–एल्म
१२. कुठल्याही गोष्टीतील नकारात्मक बाजूचा बघून दु:ख गोंजारणे– जेन्शियन
१३. कुठल्याही कामावर श्रद्धा नसल्याने वैफल्यग्रस्त वृत्तीने जगणे– गॉर्स
१४. मी, माझे, मला याचीच सतत शेखी मिरवणारे अहं केंद्रीत वर्तन ठेवणे– हेदर
१५. इतरांचे वैभव बघून सतत मनात मत्सर बाळगणे व दु:खी राहणे– हॉली
१६. भूतकाळातील दु:खे, अपूर्ण इच्छा, चुका आठवत खंत करणे– हनीसकल
१७. काम सुरू करण्याआधीच मानसिक थकव्याने हताश होते– हॉर्नबीम
१८. कुठलेही काम करताना घाई व उतावीळपणा करणे– इम्पेशन्स
१९. अंगी गुण असूनही आत्मविश्वास नसल्याने कर्तृत्वात मागे पडणे– लार्च
२०. परीक्षा, अंधार, इंटरव्ह्यू, अपघात, दंगल वगैरेंची भीती वाटणे– मिम्युलस
२१. जीवनातील सर्व आनंद सुख हरवून दु:खी निराश भावनेने जगणे– मस्टर्ड
२२. अडीअडचणींचा बाऊ न करता सतत आशावादीपणाने काम करीत राहणे– ओक
२३. कष्टमय कामे केल्याने शरीराला जाणवणारा थकवा– ऑलिव्ह
२४. कोणत्याही बाबतीत स्वत:लाच दोषी-अपराधी ठरवत राहणे– पाइन
२५. काहीतरी वाईटच घडणार असे घोकत प्रत्येक गोष्टीची चिंता करत राहणे– रेड चेस्टनट
२६. अपघात, भीतिदायक अनुभव यामुळे बसलेल्या धक्क्यातून सावरणे–रॉक रोझ
२७. तत्त्वनिष्ठेचा फाजील आग्रह धरून अरेरावीपणाने वागणे– रॉक वॉटर
२८. हे करू की ते करू अशा दोन मनांच्या कात्रीत सापडणे– स्क्लेरँथस
२९. शारीरिक-मानसिक धक्का बसल्यावर सावरण्यासाठी-स्टार ऑफ बेथलहेम.



३०. सहनशक्तीच्या पलीकडे सारे काही गेले आहे या भावनेतून आलेले औदासीन्य घालवण्यासाठी– स्वीट चेस्टनट
३१. कणखर खंबीर मनाचे कार्यतत्पर पण सतत तणावाखाली वावरणारे लोक– वर्व्हेन
३२. इतरांवर वर्चस्व गाजवताना प्रसंगी कठोर व निष्ठुर बनणे– वाईन
३३. आयुष्यातील महत्त्वाचे बदल होत असताना मनाचे संतुलन राखणे– वॉलनट
३४. मी बरा, माझे काम बरे, मला माझ्या मार्गाने जाऊ द्या म्हणणारे, एकाकी शिलेदार– वॉटर व्हायोलेट
३५. स्वत:च्याच विचारात दंग राहून पुन:पुन्हा निरर्थक कृती करीत राहणे– व्हाइट चेस्टनट
३६. मनात खूप काही घोळवणारे पण नेमके काय करावे हे न सुचणारे– वाइल्ड ओक
३७. शिष्टाचार पाळणारे, कर्तव्य करणारे पण जीवनात रस नसणारे– वाइल्ड रोज
३८. गुलाब बघताना काट्यांकडेच लक्ष देणारे, दोष-दु:खच उगाळणारे– विलो
३९. कुठल्याही अडीअडचणीच्या वेळी प्रतिकारशक्ती वाढवणे– रेस्क्यू रेमिडीज्

डॉ. रमा मराठे यांनी या सर्व पुष्पौषधींच्या संदर्भात निरनिराळ्या पेशंटच्या हकीकती सांगून त्यांच्या दुखण्याचे स्वरूप स्पष्ट केले आहे.

या औषधांपैकी एक किंवा अनेक औषधांचा वापर गरजेप्रमाणे केला जातो. ही औषधे दिवसातून पाच वेळा किंवा ठराविक अंतराने घेता येतात. ती द्रवरूपात व गोळ्यांच्या रूपात होमिओपॅथिक दुकानात मिळतात. रिकाम्या पोटी ती घेणे अधिक फलदायक ठरते.

हे पुस्तक प्रत्येक घरात हवे. आपल्या मुलामुलींच्या व घरच्या मंडळींच्या वागण्यातील व स्वभावातील अनेक खटकणाऱ्या बाबी सहजपणे दूर करणे शक्य आहे. ही औषधे अल्प किंमतीत मिळतात. त्यांचे दुष्परिणामही नसतात. 'पुष्पौषधी'चा प्रसार जितका जास्त होईल तितका आपल्या समाजातील निकोप व्यक्तींचा प्रभाव वाढत राहील.

**पृष्ठे** १३५ **किंमत** : १०० रु. **सवलतीत** : ८० रु. **सभासदांना** : ७५ रु. **पोस्टेज** :१५ रु.


## प्रत्येकाने आवर्जून वाचावे असे पुस्तक


# रंग सुखाचे

नवीन आवृत्ती

**डॉ. रमा मराठे**

प्रत्येक माणसाच्या सुखाबद्दलच्या कल्पना, रंग वेगवेगळे असतात. हे विविध रंग लेखिकेने सहजतेते, साधेपणाने शब्दबद्ध केले आहेत.

**किंमत : ७५ रु. सभासदांना : ५६रु. पोस्टेज : १५रु.**




# बाळाचे आरोग्य

**डॉ. अविनाश गोखले**

## नवे बाळ घरात येणार?<br>त्यासाठी काय<br>पूर्वतयारी हवी?

बाळाचे आरोग्य या पुस्तकाची पाचवी आवृत्ती मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे नुकतीच प्रकाशित झाली आहे. डॉ. अविनाश गोखले हे कोल्हापूर येथे वैद्यकीय क्षेत्रात आघाडीवर असून दैनिक सकाळमध्ये त्यांनी बालकांचे संगोपन आणि वाढ या विषयी एक सदर चालवले होते. त्या सदरातील लेखांचेच नंतर पुस्तकरूपात प्रकाशन झाले.

बाळाच्या आरोग्याची देखभाल ही त्याच्या जन्मानंतर नव्हे तर गर्भधारणेपासूनच सुरू होते. गरोदरपणी घेतलेला आहार, औषधे आणि त्या काळातील मातेचे मानसिक स्वास्थ्य या सर्वांचा परिणाम बालकाच्या जडणघडणीवर होत असतो. 'थॉलिडोमाइड'सारखे औषध गरोदरपणाच्या पहिल्या तीन महिन्यात घेतलेल्या मातांच्या पोटी जन्मलेल्या मुलांना दोन्ही हात वा पाय नसणे वगैरे प्रकार दिसून आले. त्यामुळे त्या औषधावर बंदी घालण्यात आली. गरोदरपणी पहिल्या तीन महिन्यात क्षकिरणांचाही प्रतिकूल परिणाम होतो. गोवर झाल्यासही गर्भाची शारीरिक बौद्धिक वाढ मंदावते. गरोदरपणात रक्तदाब ठीक असणे, विविध जीवनसत्त्वांचा आणि प्रथिनांचा आहारात पुरेसा समावेश असणे, त्याचबरोबर नियमितपणे डॉक्टरी तपासणी करून घेणे याकडे डॉ. गोखले यांनी आरंभीच लक्ष वेधले आहे.

नवीन जन्मलेल्या बाळाचे वजन अडीच ते तीन किलो असावे. उंची ४५ ते ५५ सेंटिमीटर, डोक्याचा घेर ३४-३५ सेंमी, मिनीटाला नाडीचे ठोके १३० ते १६० आणि मिनिटाला ३० ते ४० वेळा श्वासोच्छवास, हे साधारणपणे नॉर्मल मानले जाते. बाळाला आंघोळीनंतर टाळू भरणे या प्रकारात खूप तेल चोळले जिरवले जाते, त्याची गरज नसते. आंघोळीच्या वेळी नाकात व कानात तेल चोळणे अनावश्यकच नव्हे तर उपद्रवकारकही ठरू शकते असा इशारा डॉ. गोखले यांनी दिला आहे. आंघोळीनंतर बाळाला साध्या सुती कपड्यात लपेटावे; टेरिलीन, पॉलिस्टर, लोकरीचा स्वेटर वगैरेंनी ॲलर्जी होऊन अंगभर



पुरळ उठून व खाज येऊन बाळ सारखे रडत राहते. जन्मानंतर बाळाची नाळ ८/१० दिवसांनी सुकून आपोआप गळून जाते. त्या वेळी तेथे पू दिसला तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. नाहीतर धनुर्वातासारखा आजार होऊन जीव धोक्यात येतो.

आरंभीच्या काळात नवजात अर्भक २०-२२ तास झोपून राहते. पहिले दोन महिने दिवस व रात्र यातला फरकच त्याला कळत नाही. आंघोळीनंतर बाळाला डोळ्यात काजळ घालण्याचाही काही फायदा नसतो. बाळाला पाजताना त्याच्याशी बोलावे. त्याला बोलणे समजत नसले तरी आपले कौतुक होत आहे हे कळते व ते सुखावते. त्याला स्वत्वाची जाणीव होते. इतरांना आपण हवेहवेसे वाटतो, आपल्याला काही महत्त्व आहे हे त्याला कळते व ते मनाने आश्वस्त होते. बाळाच्या निरोगी निकोप भावी आयुष्याचा पाया रचला जातो तो याच काळात!

आईचे दूध हे बाळाच्या शारीरिक व मानसिक वाढीसाठी सर्वोत्तम गणले जाते. अंगावर पीत असलेल्या बालकाला जुलाब-हगवण वगैरे आजार क्वचितच होतात. बाळ रडून मागणी करते तेव्हा दूध पाजणे किंवा दर दोन-तीन तासांनी दूध पाजणे या दोन्ही पद्धतींचा वापर केला जातो. त्यांचे गुणदोषही स्पष्ट केले आहेत.

बाळाचे वजन जन्मानंतर दहा दिवस आहे तेवढेच राहते; किंवा कमीही होते. पुढे ते दर आठवड्याला २०० ग्रॅम असे तीन महिन्यापर्यंत वाढते. त्यापुढे सहाव्या महिन्यापर्यंत आठवड्याला १५० ग्रॅम वाढते. साडेपाच सहा महिन्यात जन्माच्या वेळी असणाऱ्या वजनाच्या दुप्पट होते.

पहिल्या वर्षी मुलाच्या मेंदूची वाढ मोठ्या प्रमाणावर होते. डोक्याचा घेर वर्षात ४५ सेंटीमीटर होतो. दुसऱ्या वर्षी आणखी २/३ सेंटीमीटर वाढतो. पाचव्या वर्षी ५० सेंटीमीटर होतो. अडीच वर्षापर्यंत दुधाचे सर्व दात (एकूण २०) आलेले असतात. सहाव्या वर्षापासून दुधाचे दात पडू लागतात व नवे कायमचे दात दरवर्षी चार-चार असे येऊ लागतात.

बाळाच्या आहारात सहाव्या सातव्या महिन्यापासून भाताची पेज, मऊ भात, फळांचे रस, भाजीचे सार, बिस्किटे वगैरेंचा समावेश करता येतो. हे पदार्थ एकदम देऊ नयेत. थोड्या प्रमाणात सुरू करावे व पुढे प्रमाण वाढवावे. उदा. मोसंबीचा रस प्रथम रोज दोन-तीन चमचे द्यावा. आठ-दहा दिवसांनी पाच-सहा चमचे द्यावा. पुढे १५/२० दिवसांनी मोसंबीच्या रसाबरोबर चमचाभर मऊ केल्याचा तुकडा द्यावा. नंतर केळ्याचे प्रमाण दोन-तीन चमचे असे वाढवत जावे. प्रतम द्रव पदार्थ द्यावे. नंतर मऊ भात इ. घट्ट पदार्थ. हे घट्ट पदार्थ गिळण्यासाठी जिभेची व स्नायूंची जी क्रिया व्हायला हवी ती त्याला शिकावी लागते. दूध पिताना गिळण्याची क्रिया त्याला जमते.

ग्राइप वॉटर दिल्याने बाळ गुटगुटीत होते हा गैरसमज आहे. त्याची काहीही गरज नसते असा डॉ. गोखले यांचा अभिप्राय आहे. मात्र मल्टी व्हिटॅमिन ड्रॉप्स डॉक्टरांच्या सल्ल्याने द्यावे. बाळ अंगावर पीत आहे तोपर्यंत मातेची तब्येत निरोगी आहे व आहार समतोल आहे हे गृहीत धरून हे सर्व विवेचन केले गेले आहे.

बाळाचे दात येणे, त्याने माती खाणे, सातव्या आठव्या महिन्यात पायावर पुरळ येणे,

गोवर याबाबतचेही अनेकविध गैरसमज समाजात प्रचलित आहेत. त्याबाबतची वस्तुस्थिती सांगून काय दक्षता घ्यावी हेही स्पष्ट केले गेले आहे. गोवरवर 'कोणतेही औषध अजून सापडलेले नाही. इंजेक्शन नाही. गोवरानंतर बाळाची प्रतिकारशक्ती कमी झाल्याने अँटिबायोटिक्सचा वापर करून नंतरचे दुष्परिणाम टाळले जातात एवढेच!

बाळाचा आहार, जीवनसत्त्वांच्या अभावाचे दुष्परिणाम, कुपोषण, रक्तवाढीसाठी आवश्यक लोह याबद्दलची माहितीही विस्ताराने देण्यात आली आहे. खरूज, उवा, लिखा, जंत, कावीळ, मलावरोध, जुलाब, पाटदुखी, घामोळे, वगैरे व्याधींमध्ये काय दक्षता घ्यावी, याबाबत बहुमोल सूचना केल्या गेल्या आहेत. शेवटी सुसंस्कारांचे महत्त्व सांगितले आहे. खाणे-पिणे, कपडेलत्ते व खेळणी यात थोडीफार कमतरता असली तरी हरकत नाही; पण त्यांच्यावर चांगले संस्कार योग्य वयात झालेच पाहिजेत. ती त्यांच्या आयुष्याची खरी शिदोरी ठरते.

पालकांनी व विशेषत: मातांनी पहिल्या अपत्याच्या वेळी योग्य ती मानसिक तयारी करण्याची गरज असते. हे पुस्तक अनुभवी डॉक्टरनी लिहिलेले असल्याने त्यातील प्राथमिक मुद्देही बहुमोल मार्गदर्शन करणारे आहेत. नव्याने होऊ घातलेल्या प्रत्येक मातेला त्याचा फायदा होऊ शकेल.

**पृष्ठे** ८४ **किंमत** : ५० रु. **सभासदांना** : ३८ रु. **पोस्टेज** : १५ रु.


**द कंपनी ऑफ विमेन**

**खुशवंत सिंग**

**विविध जातींच्या, वयाच्या स्त्रियांशी मुक्त शरीरसंबंध ठेवून त्यांच्या सहवासात बुडालेल्या एका कामपिसाट उद्योगपतीचं हे बिनधास्त आत्मवृत्त ! खुशवंतसिंग यांनी हे सारे प्रत्यक्षानुभव आपल्या लेखणीनं या खळबळजनक कादंबरीत जिवंत केले आहेत.**

**किंमत : २००रु. सभासदांना : १५०रु. पोस्टाने : १६५रु.**

**करोडोंचे सामान्य ज्ञान**

**किंमत : ८०रु. सभासदांना : ६०रु.**

**सुनीता दांडेकर**

**आपले सामान्यज्ञान वाढवून वेगवेगळया स्पर्धांतून मराठी माणसे 'करोडपती' व्हावीत, यासाठी वस्तुनिष्ठ अचूक प्रश्नोत्तरे.**

**किंमत : ७०रु. सभासदांना : ५३रु.**

**कोटिमोलाची प्रश्नोत्तरे**

**उमा खरे**

**दोन्ही पुस्तकांसाठी पोस्टेज २०रु.**




# श्रद्धांजली

**व्रतस्थ इतिहासयात्री......**

दि. १८ डिसेंबर रोजी इतिहासकार मु. गो. गुळवणी यांचे निधन झाले. त्यांचे वय ७६ होते.

पन्हाळ्यावर राहणारा मु. गो. गुळवणींसारखा इतिहास संशोधनातील दक्ष विद्यार्थी शोधू जाता बोटेच मोजावी लागतील,' असे गो. नी. दांडेकरांनी म्हटले होते. आयुष्यभर निरपेक्षपणे इतिहासाच्या अभ्यासाचीच महत्त्वाकांक्षा असणारे मु. गो. गुळवणी गेले. एक अगदी साधा; परंतु ज्ञानाचा व्रती उपासक म्हणून गुळवणींचे इतिहास संशोधनाचे काम अत्यंत मोलाचे आहे. कोणाचेही पाठबळ नाही. सरकारदरबारी वजन नाही. प्रतिष्ठेचे शेले नाहीत. संघटनही बेताचेच; परंतु प्राचीन पोथ्या, दुर्मिळ कागदपत्रे, ऐतिहासिक स्त्री-पुरुषांच्या समाधीचा अव्याहत शोध, अशा कामात गुळवणी सतत कार्यरत राहिले. परिस्थिती बेताचीच. किंबहुना आलटून-पालटून हलाखीची परिस्थिती त्यांनी सतत अनुभवली. उपेक्षा, वंचना तर अविरत सुरूच राहिली; परंतु तरीही धीर कधी सोडला नाही. साद-प्रतिसादाचा हव्यास मनाच्या आसपास फिरकू दिला नाही. जुनी नाणी, जुने ग्रंथ, पंचांगे, भूर्जपत्रे, ऐतिहासिक शस्त्रे, प्राचीन वस्तू, मोडीतील कागदपत्रे आणि पन्हाळगडावरचा प्रत्येक दगड हाच गुरुजींचा मुख्य खजिना होता. ते शिवभक्त तर होतेच; परंतु इतिहासाच्या प्रत्येक पानाकडे अत्यंत डोळसपणे पाहण्याची जाणीव त्यांनी सांभाळली होती. तोफांचे गोळे, महापुरुषांच्या पत्रिका, अनेक प्रकारच्या तलवारी याचे जतन करताना त्यामागे संस्कृतीचा वारसा सांभाळण्याची वृत्ती होती. त्यासाठी प्रसिद्धीचा हव्यास तर सोडाच; परंतु साधी विनंतीदेखील त्यांनी कधीच कोणालाही केली नाही. भालजी पेंढारकरांना ते गुरुस्थानी मानीत. सेतू माधवराव पगडी, दत्तो वामन पोतदार, ग. ह. खरे, डॉ. जयसिंगराव पवार यांसारख्या महाराष्ट्रातील जाणत्या इतिहास संशोधकांना गुळवणी गुरुजींच्या इतिहास संशोधनाचे फार मोल जाणवलेले आहे. शिवाजी गणेशनसारख्या चित्रपट कलाकाराने गुळवणी गुरुजींच्या शिवसंस्कृती मंडळाला पहिली आर्थिक मदत दिली. टेबल-खुर्ची, ग्रंथालयाची सुसज्जता किवा बसण्या-उठण्यासाठी बडेजावी फर्निचर असला कोणताही लवाजमा न सांभाळता इतिहासाशी सतत संवाद साधणारा संशोधक गुळवणींच्या रूपाने महाराष्ट्राला लाभला. त्यांच्या निधनाने एक आदर्श इतिहासयात्री काळाच्या पडद्याआड गेला.

जुनी नाणी, एखादी जुनी वीट किंवा मोडीतील पत्रे यांच्याशी त्यांचा जो संवाद होत असे त्यातून त्यांची चिंतनक्षमता व संस्कृती निष्ठा तेजाने तळपत असे. अलीकडे त्यांची प्रकृती बरी नसायची; तरीही लेखन-वाचन थांबले नाही. अगदी अलीकडे त्यांनी 'हुकमत पनाह' हे पुस्तक प्रसिद्ध केले. या पुस्तकाचीही कथा रोमहर्षक आहे. मुळात या पुस्तकाचे संपूर्ण लेखन १९८८ लाच पूर्ण झाले; परंतु हे लेखन हस्ते-परहस्ते होत होत गहाळ झाले.

परिणामी पुन्हा सर्व लेखन करावे लागले. या एका पुस्तकासाठी त्यांनी १९ वर्षे परिश्रम केले.

मुळात गुळवणी गुरुजींचे संपूर्ण आयुष्यच रोमहर्षक होते. वयाच्या ४४ व्या वर्षी केवळ विद्यार्थ्यांच्या आग्रहामुळे ते बी. ए. झाले. अनेक वर्षे त्यांनी गणित व संस्कृत शिक्षक म्हणून काम केले. हे काम करतानाच इतिहासाचे संशोधन हा वसा त्यांनी स्वीकारला. सर्व वेदांचा त्यांनी अभ्यास केला. वेदपठण, पुरुषसूक्त, स्त्रीसूक्त, गीता यांचे पठण करणे, ही त्यांची एक जीवननिष्ठा होती. त्यांनी अनेक स्त्रियांना रुद्र शिकविले. जातीभेद न पाळता स्त्रियांनी हेही शिक्षण घ्यायला पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. नाटिका-कविता लेखनाचा प्रांतही त्यांनी हाताळला. शिक्षकी पेशा करतानाच इतिहास संशोधन केले. इतिहासाच्या तेजाचा वारसा नव्या पिढीत संक्रमित करावा, ही त्यांची आस होती. त्यांच्या जाण्याने आज पन्हाळाही मूक झाला. (सकाळवरून)

## ज्येष्ठ विचारवंत मे. पु. रेगे

ज्येष्ठ विचारवंत आणि मराठी विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष मेघश्याम पुंडलिक रेगे यांचे २८ डिसेंबर रोजी मुंबईत निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते.या प्रसन्न आणि देखण्या व्यक्तिमत्त्वाने महाराष्ट्रातील बौद्धिक आणि सामाजिक जीवन गेली अनेक दशके समृद्ध केले. श्री. रेगे विद्वान होते, अव्वल विचारवंत होते, त्यांची सामाजिक जाणीव प्रखर होती. त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकावर मोहिनी घालणारे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

त्यांच्या अध्यापनावर प्रेम करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पिढ्याच महाराष्ट्रात दिसतात. त्यांनी अक्षरशः शेकडो विद्यार्थी घडवले आणि हे घडवणे अखेरपर्यंत थांबले नाही. यातून त्यांनी महाराष्ट्रातल्या वैचारिक विश्वाची दोहो हातांनी जी मशागत, जोपासना, उभारणी केली त्याला तोड नाही.

२४ जानेवारी १९२४ रोजी जन्मलेले रेगे एलफिन्स्टन महाविद्यालयातून एम. ए. झाले. त्यानंतर नवसारी आणि औरंगाबादच्या मिलिन्द महाविद्यालयातील अध्यापनानंतर ते मुंबईत १९५४ साली कीर्ती महाविद्यालयात प्राध्यापक झाले. तेथे उपप्राचार्य, प्राचार्य ही पदे त्यांनी भूषवली. कॉलेज सोडल्यावर त्यांनी जी. डी. पारीख संशोधन संस्थेचे संचालकपद सांभाळले. १९८१ ते १९८४ या काळात त्यांनी पुण्याच्या इंडियन एज्युकेशन इन्स्टिट्यूटची धुरा सांभाळली. त्यानंतर त्यांनी वाईच्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींच्या प्राज्ञ पाठशाळेचे उपाध्यक्षपद स्वीकारले. तर्कतीर्थांच्या निधनानंतर त्यांच्या बहुतेक सर्व जबाबदाऱ्या रेगे यांच्याकडे आल्या व त्या त्यांनी समर्थपणे पेलल्या. तर्कतीर्थांचा बहुमुखी व्यासंग, समाजाभिमुखता, प्राचीन आणि आधुनिक ज्ञानाचा अफाट विस्तार लीलया पेलण्याची क्षमता फक्त रेगे यांच्याकडे होती. त्यामुळेच ते विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष झाले. तर्कतीर्थांचे धर्मकोशाचे प्रचंड आवाक्याचे कामही रेगे यांनी त्याच ताकदीने पुढे चालवले. नवभारत व न्यू क्वेस्ट या मासिकांचे संपादक म्हणून त्यांनी लिहिलेली संपादकीये हे निर्भिड, वैचारिक चर्चेचे नमुने असत.

त्यांचे 'मी आस्तिक का आहे ?' व 'मी श्राद्ध का करतो?' हे कालनिर्णय मधील लेख खूप गाजले. त्यांच्या स्मृतीला आमची विनम्र श्रद्धांजली. (दै. महाराष्ट्र टाइम्सवरून)



# पुढच्या शतकातील वाचन: ई-बुक्स

–अमला नेवाळकर

बिल गेट्स अलिकडे जेव्हा एका दिवसाच्या भारत भेटीवर आला होता, तेव्हा त्याने प्रामुख्याने दोन गोष्टींवर भर दिला होता. एक म्हणजे नेट व्हिजन (Net Vision) आणि दुसरी म्हणजे ई-बुक (e-book). नेट व्हिजनचाच एक मोठा भाग असणाऱ्या 'ई-बुक' या संकल्पनेने सध्या सगळ्यांचेच लक्ष वेधलंय. संगणकीय क्षेत्रात नव्याने उदय पावलेली ही 'ई-बुक' संकल्पना नक्की आहे तरी काय? तांत्रिक भाषेत सांगायचं झालं तर 'ई-बुक' म्हणजे इलेक्ट्रॉनिक बुक! पुस्तकीय मुद्रण क्षेत्रातील ही संगणकीय प्रगती आहे. आपण पुस्तक कसं वाचतो? पुस्तकांच्या कपाटातून हवं असलेलं पुस्तक काढतो, मग ते एकेक पान उलटून वाचतो, अगदी असंच पुस्तक वाचन तुम्हाला संगणकावर करता येईल. पुस्तक वाचनाचा खराखुरा अनुभव तुम्हाला 'ई-बुक' देईल.

वर म्हटल्याप्रमाणे 'ई-बुक' ही पुस्तकीय मुद्रण क्षेत्रातील संगणकीय प्रगती आहे. अतिशय प्रगत अशा ई-बुक संकल्पनेमुळे येत्या काही वर्षात पुस्तकांचे मुद्रण आणि वितरण यात आमूलाग्र बदल होणार आहेत आणि याची सुरुवात झाली आहे, असं म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. हे बदल मुद्रण व्यवसायाच्या दृष्टीने अर्थातच आव्हानात्मक असणार आहेत.

मग प्रश्न असा पडतो की, एकूणच मुद्रण व्यवसाय संपुष्टात येईल का? संपूर्णतः सध्या तरी लगेचच तसं होणार नाही. प्री-प्रेस (कंपोझिंग, स्कॅनिंग), प्रेस (मुद्रण) आणि पोस्ट-प्रेस (फिनिशिंग वा बाईंडिंग) या गोष्टी राहतील. परंतु नावापुरत्या. या बाबतीत अमेरिकेचं उदाहरण देता येईल. तिथे गेल्या वर्षात प्रकाशन व्यवसायाची विक्री ३ लाख १३ हजार कोटी होती. त्यातील ५० टक्के बाजारपेठ ही व्यावसायिकांना लागणाऱ्या संदर्भ ग्रंथाची होती.

यात विद्यापीठात आणि औद्योगिक प्रयोगशाळेमधील संशोधनासाठीची पुस्तके, कायदा व वैद्यकीय क्षेत्रासाठीची पुस्तके यांचा समावेश होता. चाळीस टक्के बाजारपेठ सामान्य वाचकांची म्हणजे साहित्य, धार्मिक आणि तत्सम पुस्तकांची होती आणि १० टक्के शैक्षणिक वगैरे पुस्तकांची होती.

ही सर्व पुस्तके कागदावर शाईने छापलेली होती आणि या बाजारपेठेचा दरवर्षी सातत्याने

विस्तार होत आहे. आणखी २५ वर्षांनी या विस्तारीत बाजारपेठेतील ९०-९५ टक्के पुस्तके डिजिटल फॉरमॅटमध्ये असतील. म्हणजेच पुस्तकांचे कागदावर मुद्रण करणाऱ्यांसाठी ही बाजारपेठ उपलब्ध राहणार नाही.

गेल्या काही वर्षात मुद्रणाच्या विविध तांत्रिक अंगांचे अधिकाधिक डिजिटलायझेशन होत गेले आहे. या प्रवाहामध्ये मुद्रण हा व्यवसाय मूठभर व्यक्तींची किंवा वर्गाची मक्तेदारी न राहता संपूर्ण समाजच यात ओढला जाईल आणि लेखक आणि वाचक यांचा थेट संबंध प्रस्थापित होणार आहे.

लेखक व वाचक यामधील दुवा म्हणजे 'प्रकाशक'! लेखकाची व्यावहारिक बाजू सांभाळणे व त्याला वाचकांपर्यंत पोचविणे ही महत्त्वाची कामे प्रकाशक सांभाळतो. पण भविष्यकाळात 'प्रकाशक' नावाच्या मध्यस्थाची गरज निदान प्रतिष्ठित लेखकांना तरी भासणार नाही. म्हणजे संगणक-इंटरनेट वगैरे सुविधांचा उपयोग करून लेखक लगेच वाचकांच्या घरात जातील. उदयोन्मुख लेखकांना जरी प्रकाशकांची गरज भासली तरी प्रकाशकांची भूमिका ही 'पुस्तक छापणे' अशी राहणार नसून नवीन लेखकाला 'प्रसिद्धी देणे' इतकीच राहील.

अशा प्रकारचे बदल फक्त प्रकाशकांमध्ये होणार नसून लेखकांमध्येही होतील. आज हॅरी पॉटरसारखे पुस्तक वाचताना सतत दृक्-श्राव्याची परिणामकारक अनुभवल्यासारखे वाटते. आपण वेगवेगळे आवाज ऐकत आहोत, पुस्तकातील दृश्ये आपल्यासमोर आहेत असे वाटते. ई-बुक पुस्तकेही फक्त शब्दमय नाहीत, तर ती दृक-श्राव्य अनुभव देणारी आहेत. पुढील शतकात किंवा येऊ घातलेल्या दशकात पुस्तकांचे त्यांच्या स्वरूपावरून प्रामुख्याने तीन प्रकार पडतील. १. सी डी रॉम, २. ई-बुक, ३. पोर्टल. सी डी रॉम वा तत्सम साठवणीच्या माध्यमावर मुद्रित झालेली पुस्तके, जी गेली काही वर्षे खूपच लोकप्रिय झाली आहेत, यात विविध संदर्भ कोषांचा, शब्दकोषांचा अंतर्भाव आहे. एनसायक्लोपिडिया ब्रिटानिका, मायक्रोसॉफ्टचा एन्कार्टा, ऑक्सफर्डची संपूर्ण डिक्शनरीची आवृत्तीही यात समाविष्ट आहे.

खास पुस्तकासारखे हार्डवेअर वापरून त्यात मजकूर भरण्याची पुस्तके म्हणजे 'ई-बुक'. इंटरनेट पोर्टलवरून संगणक वा लॅपटॉप वा पामटॉपवर वाचता येऊ शकतील अशी पुस्तके. यात मजकुर तुमच्या संगणकावर किंवा वैयक्तिक संगणकावर उतरवण्याची गरज नाही. सरळ साईटवर पुस्तक उघडायचे. अर्थातच हे तीनही प्रकार जितके रोचक आहेत, तितकेच त्यातून बरेच प्रश्न किंवा समस्यासुद्धा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

यातील तिसऱ्या प्रकारात प्रकाशन संस्था, वितरक आणि ग्रंथालय या तीनही भूमिका ॲमॅझॉन किंवा अमेरिका ऑनलाईनसारख्या कंपन्या एकत्रितपणे वठवेल व या व्यवसायात मनोरंजन उद्योगाप्रमाणे कनव्हर्जन्सचे प्रस्थही येईल. अर्थात या सगळ्यासाठी १०-१२ वर्षांचा अवधी निश्चितच लागेल.

ई-बुकला कागदाची आवश्यकता नसते. येथे फक्त वेष्टण महत्त्वाचे असते. पुस्तकाचे



वेष्टण म्हणजे Reading Device जे रॉकेट-ई-बुक या कंपनीने काढले आहे. त्याची किंमत ३०० ते ५०० डॉलर्स म्हणजे १५००० ते २५००० रुपयांपर्यंत आहे, तर सॉफ्ट बुक या कंपनीची किंमत त्याच्या दीडपट आहे. पण गंमत अशी की वाचकांनी एकदाच वेष्टण विकत घ्यायचे, सर्व पुस्तके (मजकूर) त्याच वेष्टणात उतरावयाची.

हे वेष्टण अर्थातच लॅपटॉपसारखे Metallic किंवा Plolymer doped Materials (Plastic धातूचे) असते. त्यामुळे रॉकेट ई-बुक एखाद्या जाडजूड हार्ड कव्हरमधील एखाद्या पुस्तकासारखे दिसते. वजन जवळजवळ ६५० ग्रॅम. ई-बुकच्या संपूर्ण सत्रात E-book Device/Reader म्हणजेच वेष्टण हवे असल्यास स्पीकर मल्टी मीडियासकट, इंटर्नल रिचार्जेबल निकेल-हायड्राईट बॅटरी, एसी ॲडाप्टर-चार्जर आणि नोटस् काढण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स पेन (जे सरळ स्क्रीनवर लिहू शकते व या खुणा पुसताही येतात.)

सध्याचे ई-पुस्तक अर्थातच बॅटरीवर चालण्याची सोय करण्यात आली आहे व ई-पुस्तक एका वेळी १७ तास ते ३३ तास अविरत चालू राहू शकते. तसेच ते मोबाईल फोनप्रमाणे रिचार्ज करता येते. याला कमीत कमी दीड तास लागतो. रॉकेटचे ई-पुस्तक 'पांढऱ्यावरती काळे' वा खरेतर राखाडीवर (ग्रे) काळी अक्षरे उमटविते व एकावेळी अर्धे डेमी पान त्यात दिसू शकते. रॉकेटच्या एका पुस्तकात ४००० पानांचा मजकूर बसू शकतो.

प्रतिस्पर्धी सॉफ्टबुकचे पुस्तक एखाद्या उघडलेल्या मासिकाच्या आकाराचे आहे व ग्रेच्या १६ छटांमध्ये दिसू शकणारा मजकूर एका वेळी डेमीच्या एका पानाएवढा आहे. परंतु सॉफ्टबुकचे Reading Device हे रॉकेटपेक्षा दुपटीने जाड आहे व त्यात २ कादंबऱ्याएवढा (आंतरराष्ट्रीय) म्हणजे १५००-१८०० पाने मजकूर मावतो. सॉफ्टबुकने नुकत्याच काढलेल्या ई-बुकमध्ये १,००,००० पानापर्यंतचा मजकूर बसू शकेल, अशी व्यवस्था केली आहे. हल्लीच्या झपाट्याने बदलणाऱ्या या युगात ई-बुक अतिशय फायदेशीर आहे. प्रत्येक शहरातून घरांचे आकार लहान होत असल्याने पुस्तक ठेवावयास जागा अपुरी पडते.

पण ई-बुकच्या बाबतीत तो प्रश्न राहणार नाही. तसेच जगाच्या पाठीवर कुठल्याही लेखकाचे पुस्तक कमीतकमी वेळात वाचकांपर्यंत पोहोचेल. एका सीडीवर असंख्य ई-बुक्स मावतील. पुस्तकांसारखे ई-बुक फाटायचा, दुमडले जाण्याचा संभव नाही.

पण अर्थातच यालाही काही मर्यादा आहेत. ई-बुक्स वापरण्याला इंटरनेट ब्राऊजिंग, डाऊनलोडिंग, ई-बुक रीडर हे कसे करायचे, तसेच बॅटरी, रिचार्ज, मोडेम्, कनेक्टिविटी इ.ची माहिती असणे महत्त्वाचे आहे. याबरोबरच ई-बुक डाऊनलोड करताना मध्येच Fatal Error असे मेसेजेस येतात किंवा कधी मोडेम नीट कनेक्टच होत नाही. याशिवाय ई-बुकचे वजन वजन अर्धा ते दीड किलो असल्यामुळे आणि सुस्पष्टताही कमी असल्याने वाचकांसाठी हे थोडे त्रासाचं होतं.

सध्या तरी ई-बुकच्या बाबतीत सर्वप्रकारच्या शक्यता पडताळून पाह्यला जातायत्, याविषयीची माहितीही वर्तमानपत्र, मासिकांमधून उपलब्ध होतेय. या नव्या तंत्राद्वारे पुस्तक वाचकांपर्यंत पोहोचवण्याची गती विलक्षण आहे आणि म्हणूनच असे म्हणावे लागेल की 'वाचक' हाच खऱ्या अर्थाने या व्यवसायाचा राजा आहे. *( महाराष्ट्र टाइम्स वरून )*

# दीपोत्सव योजना

**प्रिय रसिक,**

**आपण नेहमीच दर्जेदार व वाचनीय पुस्तकांचे भरभरून स्वागत केले आहे. दीपोत्सव योजनेतून आपल्यासाठी अनेक वाचनीय पुस्तके भरपूर सवलतीत आम्ही सादर करीत आहोत. योजनेच्या यादीतून**

**२५००रु.किमतीची पुस्तके फक्त १६६७ रुपयांत मिळतील. (३३.३३%)**
**२०००रु.किमतीची पुस्तके फक्त १४०० रुपयांत मिळतील. (३०%)**
**१५००रु.किमतीची पुस्तके फक्त १०८८ रुपयांत मिळतील.(२७.५०%)**

१५००रु.पेक्षा कमी किमतीची पुस्तके घ्यावयाची असल्यास **'मेहता मराठी ग्रंथ जगत'** किंवा **'टी-बुक क्लब'** योजनेचे सभासद व्हा व खरेदीवर २५% सवलत मिळवा. अन्यथा १५०० रुपयांहून कमी किमतीची पुस्तके १५% सवलतीत मिळतील.

ही रक्कम आपण तीन हप्त्यांतही भरू शकाल. ३१ जानेवारीपर्यंत आपला शेवटचा हप्ता जमा होणे आवश्यक आहे. बाहेरगावच्या ग्राहकांनी प्रत्येक चेकसाठी १५रु.जादा पाठवावेत. पुस्तके घरपोच हवी असल्यास पोस्टखर्च ५०रु. पाठवावा.

या योजनेत स्वामी, श्रीमानयोगी, रुचिरा भाग १ व २ या पुस्तकांचा समावेश नाही.

**योजना ३१ जानेवारी २००१ पर्यंतच!**

| | | |
|---|---|---|
| राधेय | रणजित देसाई | १०० |
| पावनखिंड | रणजित देसाई | १०० |
| बारी | रणजित देसाई | १०० |
| राजा रविवर्मा | रणजित देसाई | १५० |
| नेताजी | वि. स. वाळिंबे | २५० |
| भारत विकणे आहेः चित्रा सुब्रम्हण्यम | अनु. वि.स.वाळिंबे | १०० |
| झोंबी | आनंद यादव | २२५ |
| काचवेल | आनंद यादव | २०० |
| डायरी ऑफ ॲन फ्रँक : **ॲन फ्रँक** | अनु. मंगला निगुडकर | १७५ |
| चीपर बाय दि डझन : **फ्रँक बंकर गिलब्रेथ** | अनु. मंगला निगुडक | १०० |



| | | |
|---|---|---|
| नॉट विदाऊट माय डॉटरः **बेट्टी मेहमूदी** | अनु. लीना सोहोनी | २०० |
| काँगो : मायकेल क्रिश्टन | अनु. अरुण मांडे | १६० |
| अणसार : वर्षा अडालजा | अनु. अंजनी नरवणे | १८० |
| कोमा : रॉबिन कुक | अनु. रवींद्र गुर्जर | ९० |
| मंदिरा : सुनील गंगोपाध्याय | अनु. तारा पंडित | १२५ |
| सुंदरबनच्या जंगलात : शिवशंकर मित्र | अनु. तारा पंडित | ६० |
| मुंबई... मुंबई ! : विक्रम चंद्र | अनु. नारायण आवटी | १५० |
| परिचय : अमृता प्रीतम | अनु. माधवी देसाई | ८० |
| द्वंद्व : विजयदान देथा | अनु. वनिता सावंत | १५० |
| नियती | माधवी देसाई | ६० |
| प्रार्थना | माधवी देसाई | १२५ |
| फॅक्टरी गेट | रंगा मराठे | १५० |
| मूल | संजोग वीरकर | ९० |
| गाजव्यथा | एम्. डी. लहानकर | १०० |
| दक्षिणरंग | मीना प्रभु | २५० |
| माझं लंडन | मीना प्रभु | २२५ |
| मालनगाथा | इंदिरा संत | १६० |
| मृद्‌गंध | इंदिरा संत | १५० |
| मुक्काम | सुधीर गाडगीळ | ७० |
| लाइफ स्टाइल | सुधीर गाडगीळ | १२० |
| माझं माझ्यापाशी? | व. पु. काळे | १०० |
| निमित्त | व. पु. काळे | ७० |
| आपण सारे अर्जुन | व. पु. काळे | ८० |
| आंधळी | अनु. शान्ता ज. शेळके | १०० |
| चौघीजणी | अनु. शान्ता ज. शेळके | ३०० |
| रंगरेषा | शान्ता ज. शेळके | ७५ |
| लज्जा | अनु. लीना सोहोनी | १२५ |
| निर्वाचित कलाम | अनु. मृणालिनी गडकरी | १५० |
| नष्ट मेयेर नष्ट गद्य | अनु. मृणालिनी गडकरी | १२० |
| एक एक पाऊल (ओशो) | अनु. भारती पांडे | ८० |
| ध्यानसूत्र (ओशो) | अनु. माधव कर्वे | १०० |
| अंतराळ | अनु. उमा कुलकर्णी | १०० |
| पर्व | अनु. उमा कुलकर्णी | २५० |
| युगंधर | निरंजन घाटे | १०० |

| | | |
|---|---|---|
| रंग सुखाचे | डॉ. रमा मराठे | ७५ |
| कथा स्वातंत्र्यलढ्याच्या : आर. के. मूर्ती | अनु. माधव कर्वे | ६० |
| शिलंगणाचं सोनं | कुमार केतकर | २५० |
| नागरिक | अविनाश धर्माधिकारी | १५० |
| द प्लेन ट्रूथ : एन. के. सिंग | अनु. माधव मोर्डेकर | २५० |
| फ्रीडम ॲट मिडनाईट : डॉमनिक लॅपिए | अनु. माधव मोर्डेकर | ३०० |
| भारतीय राजकारणातील गुन्हेगारी व भ्रष्टाचार | अनु. माधव मोर्डेकर | २०० |
| भारत : नेहरूंपासून नंदनवनापर्यंत : शशी थरूर | अनु. मधुकर तोरडमल | २०० |
| नाथ हा माझा | कांचन घाणेकर | २५० |
| रेशीमगाठी | कांचन घाणेकर | १०० |
| बिझिनेस महाराजे : गीता पिरामल | अनु. अशोक जैन | २५० |
| आय डेअर : किरण बेदी | अनु. आशा कर्दळे | २०० |
| इट्स ऑलवेज पॉसिबल : किरण बेदी | अनु. लीना सोहोनी | २५० |
| प्रवाहातील पक्षी | निलू गव्हाणकर | ७५ |
| सिलेक्टीव्ह मेमरी : शोभा डे | अनु. अपर्णा वेलणकर | ३३० |
| मी, फूलनदेवी : क्यूनी/रोंबाली | अनु. प्रमोद जोगळेकर | २५० |
| देव जो भूवरी चालिला : साईबाबा | अनु. लीना सोहोनी | १०० |
| पृथ्वीवर माणूस उपराच! (विज्ञान) | सुरेशचंद्र नाडकर्णी | ६० |
| खिडकीलाही डोळे असतात (विज्ञान) | डॉ. बाळ फोंडके | ११० |
| सागर | माधवी देसाई | ६० |
| उत्तरार्ध | विजया राजाध्यक्ष | १२५ |
| निसटलेले | आशा बगे | १०० |
| ऋतूवेगळे | आशा बगे | ६० |
| खसखशीचा मळा | द. ता. भोसले | ७५ |
| मुळे आणि पाळे | वसंत नरहर फेणे | ८० |
| कालिंदीच्या तीरावरती | य. दि. फडके | ७५ |
| शेष-अवशेष | अरविंद रे | १२५ |
| तुम्ही अन् तुमची मुलं : पार्किन्सन/रुस्तुमजी/पावरी | अनु. अविनाश भोमे | ६० |
| तुम्ही आणि तुमचं वैवाहिक जीवन : पार्किन्सन/रुस्तुमजी/व्हिएरा | अनु. प्रमोद संभूस | ७० |
| सभेत कसे बोलावे | श्याम भुरके | ५० |



| | | |
|---|---|---|
| ही सुट्टी कशी घालवाल? | मनोहर चंपानेरकर | ४२ |
| हृदयविकार निवारण | शुभदा गोगटे | १५० |
| निवृत्त ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्योग व्यवसाय | गंगाधर महाम्बरे | ४० |
| अभ्यासातील प्राविण्य : दौलतभाई देसाई | अनु. वसंत नागपुरे | ३५ |
| यशाचा कानमंत्र : अनंत पै | अनु. चारुलता पाटील | ५० |
| आत्मविश्वासाचा कानमंत्र : अनंत पै | अनु. चारुलता पाटील | ३५ |
| आपण आणि आपले आरोग्य | अनु. प्रमोद जोगळेकर | ७० |
| वैज्ञानिक खेळणी | डी. एस्. इटोकर | ४५ |
| छंदातून विज्ञान | डी. एस्. इटोकर | ६० |
| हा खेळ बाहुल्यांचा | डी. एस्. इटोकर | ५० |
| जिज्ञासेतून विज्ञान | कविता भालेराव | २५ |
| शास्त्र-गंमत जत्रेत चौकस चिंगी : **कुलकर्णी/भागवत/गंभीर** | अनु. मीना किणीकर | ७० |
| प्रयोग करूया गमतीचे : कुलकर्णी/भागवत/गंभीर | अनु. मीना किणीकर | ७० |
| चला, प्रयोग करू या! | | |
| उर्जा | मीना किणीकर | २० |
| उष्णता | मीना किणीकर | २० |
| अन्न | मीना किणीकर | २० |
| परिस्थितीशास्त्र | मीना किणीकर | २० |
| रसायने | मीना किणीकर | २० |
| हवा | मीना किणीकर | २० |
| पदार्थ | मीना किणीकर | २० |
| अवकाश | मीना किणीकर | २० |
| हवास्थिती | मीना किणीकर | २० |
| गती : चलन | मीना किणीकर | २० |
| ध्वनी | मीना किणीकर | २० |
| मोजमापे | मीना किणीकर | २० |
| अज्ञात अनामिकांचे कर्तृत्व | अनु. वैशाली जोशी | ५० |
| किमया जनुकांची : बालसुब्रह्मण्यम | अनु. वैशाली जोशी | ७० |
| माहितीचे महामार्ग : के. डी. पावटे | अनु. वैशाली जोशी | ७० |
| जनुक मोहिम : सुकन्या दत्ता | अनु. वैशाली जोशी | ६० |
| परिक्षानळीतील जंगले : मॅस्कारेन्हास | अनु. प्रमोद जोगळेकर | ४५ |
| हिरवे जनुक : शकुंतला भट्टाचार्य | अनु. प्रमोद जोगळेकर | ६० |

| | | |
|---|---|---|
| जनुक शक्ती : दत्ता/भट्टाचार्य | अनु. प्रमोद जोगळेकर | ६० |
| नवचैतन्याचा झरा : डॉ. बाळ फोंडके | अनु. प्रमोद जोगळेकर | ६५ |
| विज्ञान, तंत्रज्ञान आणि प्रगती | नलगे / मुळीक | ७० |
| पर्यावरण संतुलनासाठी हिरवं सोनं | डॉ. सरिता पटवर्धन | ६० |
| शरीरातील विविध संस्था - | | |
| फुप्फुसे, हृदय, मेंदू | वैशाली जोशी | २५ |
| अंतःस्राव, गर्भाशय, जठर | वैशाली जोशी | २५ |
| स्नायू, अस्थि | वैशाली जोशी | २५ |
| त्रिमिती | मीनाक्षी सरदेसाई | २५ |
| निवडक अरेबियन नाईटस् | वि. के. फडके | २० |
| कावळेदादा गेला भुलून! | पंढरीनाथ रेगे | १० |
| पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी | अनिल किणीकर | २० |
| पंचतंत्रातील बोधपर गोष्टी | अनिल किणीकर | २० |
| पंचतंत्रातील रोचक गोष्टी | अनिल किणीकर | २० |
| पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी | अनिल किणीकर | २० |
| हितोपदेश : मनोरंजक कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| हितोपदेश : बोधप्रद कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| हितोपदेश : रोचक कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| हितोपदेश : प्रेरक कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| मराठी लेखन दर्शन | चंद्रहास जोशी | ६० |
| मराठी निबंध ज्योती | चंद्रहास जोशी | ७० |
| अचूक मराठी लेखन प्रबोध | चंद्रहास जोशी | ३५ |
| ज्ञानदा निबंधमाला | दिपाली पोरे-वेल्हाळ | ५० |
| पर्याय शब्दकोश | वि. शं. ठकार | ३०० |
| Easy English Grammar & Composition | Manohar Champanerkar | 70 |
| Fifty Essays | Srinivas | 50 |
| A Methodical English Grammar 2000 | G. D. Moray | 110 |

## त्वरा करा.

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६ सदाशिव पेठ, धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फॅक्स : ०२०-४४७५४६२



◆ जानेवारी २००१
◆ वर्ष पहिले
◆ अंक तिसरा

# मेहता मराठी ग्रंथजगत

- संपादक : सुनील मेहता
- कार्यकारी संपादक : शंकर सारडा
- संपादन सहाय्य : सुनीता दांडेकर
- अंकाची किंमत १० रु.
- वार्षिक वर्गणी ८० रु.
- वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी
- प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

*— अनुक्रमणिका —*

| | |
|---|---|
| **संपादकीय** - शतकाची शिदोरी | २ |
| **साहित्यवार्ता** | **५** |
| **पुस्तक परिचय** | |
| भूमिकन्या | २१ |
| स्वामी : एक शोध | २४ |
| रेकी | २८ |
| स्वभावाला औषध आहे | ३१ |
| बाळाचे आरोग्य | ३६ |
| **श्रद्धांजली** | **३९** |
| **पुढच्या शतकातील वाचन- ई-बुक्स** | ४१ |

मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*
संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता, १२१६ सदाशिव पेठ, धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०. फॅक्स : ०२०-४४७५४६२

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*